# पुणे महानगरपालिका
## स्थायी समिती सभा
## कार्यपत्रिका क्र.४४,दि.१२/१/२०१६
## सभा क्र.६३,दि.१३/१/२०१६ चा वृत्तांत

| | | |
|---|---|---|
| नगरसचिव | | |
| विषय क्र. | २०१४ ते | २०५५ |
| परिपत्रक वि.क्र. | २०५६ ते | २०७८ |
| ठराव क्र. | २०२४ ते | २०७८ |

स्थायी समितीची तहकूब सभा बुधवार, दिनांक १३/१/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. सौ.कदम अश्विनी नितिन – अध्यक्षा
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत | १०. | मा. सौ.टिळक मुक्ता शैलेश |
| ४. | मा.सौ.ओरसे शारदा शंकर | ११. | मा.तुपेरे राहूल बापू |
| ५. | मा.कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम | १२. | मा.बागवे अविनाश रमेश |
| ६. | मा.ॲड.कदम रामचंद्र उर्फ चंदुशेठ आत्माराम | १३. | मा.सौ.बाबर आरती साईनाथ |
| ७. | मा.केमसे शंकर दत्तात्रय, सभागृहनेते | १४. | मा. राणे अनिल बाबूराव |
| ८. | मा.सौ.ओसवाल दिपाली प्रमोद | १५. | मा.सौ.लोणकर नंदा नारायण |
| ९. | मा.जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत | १६. | मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत |

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

मा. सचिन दोडके    मा.रविंद्र धंगेकर    मा.दिलीप बराटे

लघुलेखक :-

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त | २६. | मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२) |
| २. | मा. ,अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.) | २७. | मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी |
| ३. | मा. ओमप्रकाश बकोरिया,अति. महा. आयुक्त (वि.) | २८. | मा.शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी |
| ४. | मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ) | २९. | मा.सुनिल केसरी, उप आयुक्त (परिमंडळ क्र.१) |
| ५. | मा.अभिषेक कृष्णा, अध्यक्ष व व्यव. संचालक,पीएमपीएमएल | ३०. | मा.ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त (परिमंडळ क्र.२) |
| ६. | मा.राजेंद्र शेवाळे, उपनगरसचिव | ३१. | मा.मधुकांत गरड, उप आयुक्त (परिमंडळ क्र.३) |
| ७. | मा.हनुमंत नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.) | ३२. | मा.सुरेश जगताप, उप आयुक्त (परिमंडळ क्र.४) |
| ८. | मा.अंबरिष गालिंदे,सह आयुक्त (लेखापरिक्षक) | ३३. | मा.सुरेश जगताप,उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) |
| ९. | मा. सुहास मापारी,(कआ. व क.सं. प्रमुख) | ३४. | मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.) |
| १०. | मा.अनिल पवार, उप आयुक्त (विशेष) | ३५. | मा.राजेंद्र राऊत अधी.अभियंता (पथ) |
| ११. | मा.नितिन उदास, उप आयुक्त (ग.व.नि.) | ३६. | मा.श्रीनिवास कंदूल, अधीक्षक अभियंता (विद्युत) |
| १२. | मा.प्रकाश बोरसे, उप आयुक्त (जिं.घ.) | ३७. | मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत) |
| १३. | मा.मंगेश जोशी, उपायुक्त (सामान्य प्रशासन) | ३८. | मा.ना.न.बारापात्रे, विकास अभियंता, (पथ) |
| १४. | मा.विजय दहीभाते, उप आयुक्त (तांत्रिक) | ३९. | मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता(व्हे.डेपो.) |
| १५. | मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख | ४०. | मा.विजय कुलकर्णी,अधी.अभि.(ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प) |
| १६. | मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी | ४१. | मा.संतोष पवार, सुरक्षा अधिकारी |
| १७. | मा. विलास कानडे, उप आयुक्त स्थानिक संस्था कर | ४२. | मा.शाम ढवळे, अधीक्षक अभियंता (हरिटेज) |
| १८. | मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता | ४३. | मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी |
| १९. | मा.राजेंद्र राऊत, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ ) | ४४. | मा.डॉ.उदय टेकाळे, वि. कार्या.(दक्षता) (सांख्यिकी व संगणक) |
| २०. | मा. सौ. मिनाक्षी राऊत,शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि. | ४५. | मा.मदन आढारी कार्यकारी अभियंता (पा.पु.) |
| २१. | मा. दहीफळे बबन, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ | ४६. | मा.संदीप खांदवे, कार्यकारी अभियंता (भवन) |
| २२. | मा.ॲड.थोरात, प्र.मुख्य विधी अधिकारी | ४७. | मा. राहूल जगताप, सांख्यिकी व संगणकप्रमुख |
| २३. | मा.माधव जगताप, प्र.उपायुक्त अतिक्रमण | ४८. | मा.मंगेश दिघे, पर्यावरण अधीक्षक |
| २४. | मा.घोरपडे, सहा.उद्यान अधिक्षक | ४९. | मा.भोसेकर, प्र.उपायुक्त, सुरक्षा रक्षकप्रमुख |
| २५. | मा. , उपायुक्त (समाजकल्याण) | ५०. | मा.धारूरकर, ऑपरेशनल मॅनेजर (पी.एम.पी.एम.एल.) |

# पुणे महानगरपालिका

**स्थायी समिती सभा**

**कार्यपत्रिका क्र.४४, दि.१२/१/२०१६**

**सभा क्र.६३, दि.१३/१/२०१६ चा वृत्तांत**

मा.सौ.शारदा ओरसे–मा.अध्यक्षा माझ्या प्रभागामध्ये एक महिन्यापासून पाणी पुरवठा होत नाही आणि मी या बाबत अधिकाऱ्यांना फोन केला असता ते व्यवस्थित माहिती देत नाहीत. फक्त अधिकारी हो म्हणतात आणि पुढे काहीच करीत नाहीत. मी मा.आयुक्त साहेबांना सुध्दा याबाबत दूरध्वनी केला होता आणि ते खालच्या अधिकाऱ्यांना फक्त सांगतात पण काम काही होत नाही.

मा.मदन आढारी,कार्य.अभि.(पा.पु)–मा.अध्यक्षा, काल रात्री संपूर्ण स्टाफ यासाठीच आपल्याबरोबर कामासाठी फिरत होते आणि या भागातील पाण्याचा प्रश्न लवकरात लवकर सुटेल. पाण्याचा प्रेशर थोडा कमी आहे.

मा.सौ.शारदा ओरसे–कुठलेही काम होत नाही. अधिकारी फोन उचलतात पण काम होतच नाही. मी याबाबत मा.आयुक्त साहेबांना सुध्दा सांगितले होते त्यांनी ते किती अधिकाऱ्यांना सांगितले परंतु त्यामध्ये काय झाले? काहीच झाले नाही.

मा.मदन आढारी,कार्य.अभि.(पा.पु)–मा.अध्यक्षा ते काम चालू आहे.

मा.सौ.शारदा ओरसे–तिथे पाणी का येत नाही, हे पाहिले पाहिजे. साहेब, अधिकारी कामे करीत नाहीत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–मा.आढारी साहेब, मा.सभासद यांची मागणीनुसार त्यांच्या भागामध्ये जादा वेळ पाणी पुरवठा करा. किंवा एखाद्या भागाच्या पाणी पुरवठा वेळेमध्ये बदल करा. त्यांच्या भागाला वेगळा वेळ देऊन तिथे भरपूर पाणी पुरवठा होईल, अशी व्यवस्था करा.

मा.मदन आढारी,कार्य.अभि.(पा.पु)– साहेब, आम्ही ते करतो वैदूवाडीला बुस्टर आहे आणि तिथे छोट्या छोट्या गल्लीबोळ असल्यामुळे तिथे टँकर सुध्दा जाऊ शकत नाही. त्यामुळे आम्ही तिथे बुस्टरनेच पाणी देऊ, तिथे लाईन चोकअप झाली आहे आणि त्या भागात रात्री १० ते १२ वाजेपर्यंत पाणी सोडले जाते. या भागात पाण्याचा दाब कमी पडला ही वस्तुस्थिती आहे.

मा.सौ.शारदा ओरसे–तुम्ही पाणी सोडता काही भागात पाणी येते हे बरोबर आहे परंतु ज्या भागात पाणीच येत नाही त्याभागात तुम्ही पाणी देतच नाही.

मा.मदन आढारी,कार्य.अभि.(पा.पु)–आम्ही त्याभागात प्रेशर टॅब घेतला आहे.

मा.सौ.शारदा ओरसे–ते कधी होणार आहे? ते सांगा.

मा.मदन आढारी,कार्य.अभि.(पा.पु)–पुढील ४ ते ५ दिवसात ते काम करू.

मा.सौ.शारदा ओरसे–अधिकारी सहकार्य करीत नाही असा भाग नाही परंतु त्या भागात पाणीच येत नाही. अधिकाऱ्यांनी सहकार्य केले म्हणजे तिथे पाणी आले असे म्हणता येईल का? तिथे पाणी येतच नाही. आम्ही सुध्दा नागरीकांना आश्वासने देतो परंतु यावेळी नागरीक आम्हाला असे सांगतात की, आम्हाला पाणी मिळत नाही, हे आम्ही मा.आयुक्त साहेबांकडे जाऊन सांगू. आमचा झोपडपट्टीचा भाग आहे.

मा.सौ.शारदा ओरसे–त्या भागात आमची टीम फिरत आहे आणि त्यावेळी मा.सभासद सुध्दा तेथे उपस्थित असतात. तिथे रात्री १० ते १२ वाजेपर्यंत पाणी सोडले जाते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता– तिथे जादा वेळ पाणी पुरवठा करावा.

मा.सौ.शारदा ओरसे–आम्हाला जादा पाणी नको परंतु तिथे पाणी का येत नाही? याचातरी शोध लावू द्या. तिथे एक महिन्यांपासून पाणी येत नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–आजच्या आज तेथे शोध घेऊन, तेथील पाण्याचा दाब वाढवावा व हे काम , मा.सभासद यांना दाखवावे. तेथील काही घरांमध्ये पाहणी करून ती शहानिशा करून घ्यावी.

मा.सौ.आरती साईनाथ बाबर–मा.आयुक्त साहेब, मी इथे पिण्याच्या पाण्याचे काही सॅम्पल्स आणली आहेत आणि त्यातील आपण कोणते पाणी पिऊ शकतो? आपण ग्लास मधील पाणी पहा आणि बाटलीतील पाणी पहा. हे पाणी पिण्याआधी जर थोडे हलवले तर तुम्हाला त्यामध्ये बारीक पार्टिकल्स दिसतील आणि हे पाणी आमच्या प्रभागातील लोक पितात. मी याबाबतची विचारणा करण्यासाठी मा.कुलकर्णी साहेबांच्या कार्यालयात गेले असताना, मला असे उत्तर मिळाले की, ही कॉमन गोष्ट आहे. हे सगळीकडेच आहे. आपण यावर काहीच करू शकत नाही म्हणजे यावर सोल्यूशन काढायचे सोडून ते असे म्हणतात की, असे सगळीकडेच आहे आणि जरी काही केले तरी दोन दिवसांनंतर पुन्हा असेच पाणी तुमच्याकडे येणारच आहे, म्हणजेच यांची काम करण्याची नितीमत्ताच नाही, असे दिसून येते. याबाबत ड्रेनेज विभागाकडे विचारणा केली तर ते असे सांगतात की, हे आमचे काम नाही. तसेच याबद्दल पाणी पुरवठा विभाग सुध्दा असेच सांगतो की, हे काम आमचे नाही.

मा.महा.आयुक्त–संबंधीत अधिकाऱ्यांना बोलावून हे काम करून घेतो.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–मा.आयुक्त साहेब, मागील सभेमध्ये आम्ही अशी मागणी केली होती की, वाहन विभागाच्या सगळया कामकाजाची चौकशी रिटायटर न्यायाधीशांमार्फत करण्यात यावी, याबद्दल असे सांगितले होते की, आम्ही याबाबत ८ दिवसांमध्ये माहिती देतो असे सांगण्यात आले होते. या बाबीस १५ दिवस पूर्ण झाले आणि यावर काहीच केले नाही किंवा याचा कोणताही तपशील आम्हाला दिला नाही. तर फ्रॉड आणि गफला करण्याची चौकशी करण्याची प्रशासनाची इच्छा आहे का? आणि तसे नसेल तर आम्हाला तसे सांगा. तुम्ही श्री.पोळ यांना सोडून द्या, आम्हाला काही प्रॉब्लेम नाही. परंतु जर करणार असाल तर हे का केले नाही? हे सुध्दा सांगा. तुम्ही अधिकाऱ्यांना असे किती दिवस पाठीशी घालणार? इथे स्थायी समितीमध्ये सांगितल्यानंतर, इथे हे ठरल्यानंतर त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही. त्यांना एक साधी नोटीस सुध्दा दिली जात नाही की, तुमच्या कामात चुका घडत आहेत आणि हे असे होऊन सुध्दा हे लोक अद्यापही फ्रॉड करीत आहेत. टेंडर २०९, र.रू.१५ कोटी या कामासाठी तीन कंपन्यांनी निविदा भरली होती आणि आपण या तीन कंपन्यांचे रेट जर पाहिले तर आपण आश्चर्यचकित व्हाल. त्यामध्ये एक लोकराज्य स्वयंसेवी संस्था आहे त्यांनी ७५ हजार रू.दर दिला आहे. दुसरी स्वयंभू ट्रान्सपोर्ट कंपनीने १ लाख ६० हजार रू चा दर दिला आहे आणि ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट या कंपनीने १ लाख ७५ हजार रू.चा दर दिला आहे. यामध्ये लोकराज्य कंपनी हे काम ७५ हजार रू.मध्ये करायला तयार आहे. हे टेंडर १५ कोटी रू.चे आहे आणि त्या लोकराज्य संस्थेला काहीही करून, त्यांचे पाकिटच ओपन करायचे नाही, असे ठरवून त्यांनी ते पाकिट ओपन केले नाही, याचे

कारण असे दिले आहे की, विधीकडून मत घ्या. मी याबाबत असे विचारतो की, लोकराज्यने टेंडर भरले आहे आणि त्यांनी पार्टनरशिप केली किंवा नाही केली तो विषय सोडून द्या. ही संघटना बेरोजगार युवकांची आहे आणि त्यांचे टेंडर पाकिट ओपन करण्यास कोणता प्रॉब्लेम होता? आणि त्यांना बेकायदेशीर ठरवून त्यांना या टेंडर मधून बाजूला का केले? आणि जर का हे काम त्यांना दिले तर ते अर्ध्या किंमती मध्ये होणार होते.

मा.अविनाश बागवे–कोणते काम होते?

मा.महा.आयुक्त–घंटागाडीचे काम होते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–सगळे ते ग्लोबल वेस्ट, घंटागाडीने कचरा गोळा करणे, कचरा जमा करणे या कामासाठी, जो ७५ हजाराने काम करायला तयार आहे आणि हे १५ कोटी रू.चे टेंडर आहे यामुळे ते काम ७.५० कोटी रू.मध्ये होईल. दुसऱ्या संस्थेने १ लाख ६० रू.ने दर दिला म्हणजे ते काही फार कमी करीत नाही तर १० टक्के कमी करीत आहे म्हणजेच ९० टक्के तर पहिली संस्था ५० टक्यांमध्ये काम करायला तयार आहे म्हणजेच यामध्ये र.रू.४५ हजार प्रत्येकी इतका फ्रॉड आहे. साहेब, यामध्ये ५० टक्के फ्रॉड आहे. यामध्ये वाईट का वाटते की, एखादा माणूस टेंडरने भरीत आहे.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–मा.सभागृहनेते, यापूर्वी महापालिकेने असली टेंडर्स भरली नाहीत का?

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–भरलेली आहेत परंतु इतके लॉबिंग आणि इतक्या पध्दतीने जाम करतात. यामध्ये माझे मत असे आहे की, कायद्याने लोकराज्यचे पाकिट उघडायला पाहिजे होते.

मा.अविनाश बागवे–ते तांत्रिक निकषामध्ये बसत होते का?

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–होय, ते तांत्रिक निकषामध्ये बसत होते.

मा.अविनाश बागवे–यामध्ये कोणती अडचण होती? याबाबत माहिती द्यावी.

मा.महा.आयुक्त–टेंडर कंडीशन्स मध्ये काय होते?

मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(वाहन विभाग)–लोक राज्यने जॉईन्ट व्हेंचर मध्ये टेंडर भरले होते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–लोकराज्यने टेंडर भरताना फक्त लोकराज्य म्हणून भरलेले आहे. त्यानंतर त्यांनी पार्टनरशिप केलेली आहे. यामध्ये खोटे सांगू नये, गफलत करू नये. माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत. मी ती कागदपत्रे दाखवू शकतो आणि तुम्ही आता रेकॉर्डवर असे सांगत आहात की, पार्टनरशिप मध्ये भरले म्हणून परंतु त्यांनी ही पार्टनरशिप नंतर केली आहे. त्यांनी नोटरी करून पार्टनरशिप केली आहे. त्यांना जर आर्थिक मदत हवी असेल तर ती मिळायला पाहिजे.

मा.अविनाश बागवे–ते पण चुकीचेच आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–पण ते नंतर केले आहे. ठीक आहे की, लोकराज्यने टेंडर भरले आहे. ती बेराजगारांची संघटना आहे आणि ती कायद्यात बसते आणि त्याबाबत राज्य शासनाकडून अभिप्राय घेतला आणि राज्य शासनाने त्यांना हे बरोबर असल्याचे सांगितले आहे आणि अशीच बरीच प्रकरणे आहेत. टेंडर क्र.२६१ यामध्ये ड्रायव्हरचा ठेका आहे आणि यामध्ये ३५ लाख रू.कसे काय दिले? याबद्दल मागील वेळेस विचारणा केली होती.

मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(वाहन विभाग)–सर, त्यामध्ये ३५ लाख रू.दिलेले नाहीत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–३३ लाख रू.

मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(वाहन विभाग)–सर, माहे एप्रिल पासून ड्रायव्हर लोकांचे पेमेंट स्थगित होते आणि मान्यता घेऊन हे पेमेंट अदा केलेले आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–ते पैसे कोणाच्या नावाने घेतले.

मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(वाहन विभाग)–सर,ड्रायव्हर लोकांचे टेंडर होते आणि आर.डी. कॉन्ट्रक्ट नावाने पैसे घेतले.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–कोणाच्या नावाने कॉन्ट्रक्ट होते? आणि कोणाला पैसे दिले.

मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(वाहन विभाग)–आर.डी. कॉन्ट्रक्टच्या नावाने घेतले आणि आर.डी. कॉन्ट्रक्टलाच पैसे दिले.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–हे चुकीचे सांगत आहेत आणि मागील आठवड्यात सुध्दा याबद्दल विचारणा केली होती आणि याबद्दल वर्तमानपत्रात सुध्दा छापून आले आहे की, एकाच्या नावाने पेमेंट घेतले आणि दुसऱ्याला दिले.

मा.अविनाश बागवे–असे झालेले नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–१०० टक्के झाले आहे.

मा.मुकारी आण्णा आलगुडे– चौकशी करणार होते. आदेश दिलेले आहेत ती चौकशी चालू करा.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–टेंडर क्र.२०९ मध्ये ५० टक्केचा इतका मोठा फरक असताना त्याबाबत विचार का केला गेला नाही?

मा.किशोर पोळ,कार्य.अभि.(वाहन विभाग)–सर, लोकराज्य अपात्र असल्याने त्यांचे पाकिट ओपन केले नाही त्यामुळे मला त्यांचे दर माहिती नाहीत. फक्त दोन लोक पात्र होते त्यांचे पाकिट ओपन केले होते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता– मा.आयुक्त साहेब, हा माणूस फ्रॉड आहे आणि आमची अशी मागणी आहे की, तुम्ही ताबडतोब यांना सस्पेंड करा आणि तेथील चौकशी मध्ये यांनी हस्तक्षेप करता कामा नये. आम्हाला यांच्यावर तातडीने कारवाई हवी आहे आणि तसे होत नसेल तर आम्हाला आमच्या पध्दतीने आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल. यामध्ये इतके स्पष्ट दिसत आहे की, ५० टक्यांमध्ये काम होणार आणि १५ कोटी रू.च्या ऐवजी ७.५० कोटी रू.मध्ये काम होऊन ५० टक्के पैसे वाचणार आहेत आणि अशा गोष्टी न करता ही माणसे संगनमत करून महानगरपालिकेला बुडवायचा प्रयत्न करीत आहेत आणि आपण त्यांना पाठीशी घालत आहोत, असे कसे चालेल.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–चौकशीचे आदेश दिले होते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता– ते काहीच झाले नाही आणि माझी मागणी अशी आहे की, यामध्ये जर वेळ लागत असेल तर जोपर्यंत चौकशी होत नाही तोपर्यंत सस्पेंड करा. त्या विभागात जे कोणी संबंधीत असतील त्यांना हा पदभार द्यावा कारण यांची चौकशी लावायची आहे आणि या कामामध्ये भयंकर गडबडी आहेत. आम्ही तुम्हाला कागदोपत्री पुरावे दिले आहेत आणि याबाबत मध्यतंरी पेपरला सुध्दा छापून आले होते की, हा माणूस दुसऱ्याच्या नावाने ३३ लाख रूपये घेत आहे आणि तिसऱ्या माणसाला देत आहे. तुम्हाला आणखी कोणते पुरावे पाहिजेत? या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे वाहतूक विभागाच्या प्रत्येक कामकाजामुळे पुणेकरांचे जे नुकसान होत आहे. मा.आयुक्त साहेब, वाहतूक विभागाकडे स्पेअर पार्टस पुरविणे या कामामध्ये सुध्दा खूप भानगडी आणि गफले आहेत. मा.आयुक्त साहेब,

आपण तिथे पाहणी केली आहे का? गाड्यांच्या बाबतीत सुध्दा तसेच आहे. तिथे कितीतरी गाड्या पडून आहेत. नव्याने गाड्या घेतलेल्या आहेत याबद्ल मागे सुध्दा चर्चा झालेली होती. परंतु त्यावर काहीही झाले नाही. फक्त त्यावर चर्चा केली जाते आणि त्यावर दुर्लक्ष केले जाते आणि तो माणूस मोकाट सुटतो. त्यामुळे आमचे स्पष्ट मत आहे की, जोपर्यंत ही चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत यांना सस्पेंड करा अन्यथा त्यांना दुसरीकडे कुठेतरी कचरा डेपोवर टाका, त्यांना सुध्दा काम करू द्या. महापालिकेमध्ये जे सक्षम अधिकारी आहेत त्यांनीच काम करायचे आणि यांच्या सारख्यांनी नुसता आयता उपभोग घ्यायचा असे नाही चालणार.

मा.महा.आयुक्त–मा.अध्यक्षा, महोदया, मा.सभागृहनेत्यांनी जो विषय मांडला आहे त्या संबंधी जे कागदपत्रे दिली आहेत त्याची तपासणी करून या चौकशीबाबतचा योग्य निर्णय येत्या स्थायी समितीपूर्वी घेतला जाईल.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता– यामध्ये आणखी एक विषय आहे की, ही चौकशी पूर्ण होईपर्यंत टेंडर क्र.२०९ वरील पुढील कोणतेही कामकाज करू नये. हे सगळे स्टॉप करा याची पूर्ण माहिती घ्या. यामध्ये मोठा फ्रॉड आहे आणि जर तुम्हाला हे द्यायचे असेल तर द्या त्यानंतर मात्र आम्ही पिच्छा सोडणार नाही. मा.आयुक्त साहेब, यामध्ये ते सगळे स्टॉप झाले पाहिजे. पुन्हा फक्त चर्चा आणि त्यावर निर्णय न होणे असे होऊ नये. मा.आयुक्त साहेब, मी दुसरा मुद्दा मांडतो. मी इथे शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांना दिलेल्या गणवेशाचा नमुना आणला आहे. त्यातील हा नवीन शर्ट आहे आणि हा एकदाच धुतला आहे हा शर्टची जो दर्जा आहे तो पहावा आपल्याला हवे असल्यास हा शर्ट लॅबोरेटरी मध्ये तपासावा आणि माहिती घ्यावी की, हा शर्ट किती वेळा धुतला असेल. तसेच शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांना जे बूट दिले त्याचेही सॅम्पल्स मी आपल्याला दाखवित आहे. शिक्षण मंडळाने ३ साईजचे शूज घेतले आहेत आपण चांगल्या दर्जाचे साहित्य घ्यावे असे ठरवून दिले होते. यातील काही बुटांची साईज कोणत्याच मुलाला बसू शकणार नाही.

मा.अविनाश बागवे–मा.दौंडकर साहेब, या सगळ्या गोष्टी आपल्या नेतृत्वाखाली आणि महानगरपालिकेच्यावतीने झाल्या होत्या.

मा.महा.आयुक्त–मी सभागृहाला विनंती करेन हे साहित्य नगरसचिवानी ताब्यात घ्यावे आणि आम्ही हे लॅबोरेटरीकडे पाठवू आणि या साहित्याचा तपासणी रिपोर्ट घेऊ.

मा.अविनाश बागवे–सर,शिक्षण मंडळाच्या बजेटच्या वेळी सुध्दा हा विषय झाला होता आणि या वर्षाच्या मध्यतंरी साहित्य वाटपाच्या वेळी मुख्यसभेमध्ये सुध्दा काही नगरसेविकांनी मुख्यसभेमध्ये हा मुद्दा उपस्थित केला होता.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–ही टेंडर्स पूर्वीचेच ठेकेदार भरीत आहेत का? याची चौकशी झाली पाहिजे.

मा.सौ.मुक्ता टिळक– आपण वस्त्रोद्योग महामंडळाकडून कपड्याची तपासणी करतो, आपण चर्मोद्योग महामंडळाकडून बुटांची तपासणी करतो त्याचा उपयोग काय होतो? मग त्यांची तपासणी चुकीची आहे का?

मा.शंकर केमसे,सभागृहनेता– तुम्ही जर स्वेटर पाहिला तर आश्चर्यचकितच व्हाल. ते सॅम्पल्स मी पुढील सभेत दाखवितो.

मा.श्रीकांत जगताप–प्रशासनाला शैक्षणिक दर्जाचीच काळजी नाही आणि आपण शैक्षणिक साहित्याबद्दल बोलत आहोत. हे तर सगळे सोडाच पण हे शिक्षक सुध्दा देऊ शकत नाहीत. पहिल्यांदा शिक्षणाच्या दर्जाची काळजी करा.

मा.अविनाश बागवे–मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाच्या कारभारावर अनेक टीका होतात. शैक्षणिक साहित्य वेळेवर मिळत नाही, त्यातील दर्जाबद्दल टीका होते म्हणून गेल्यावर्षी आपल्या अध्यक्षतेखाली कारभार चालू होता आणि यावर्षी हे साहित्य वेळेत मिळावे म्हणून निर्णय सुध्दा घेतले आणि असे करून सुध्दा असे होत असेल तर मग त्यांना दोष देण्यात काहीच अर्थ नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता– एका धुण्यामध्ये अशी अवस्था होते मग त्याला अर्थ काय?

मा.सौ.मुक्ता टिळक– मग आपल्या तपासणीला अर्थ काय?

मा.अविनाश बागवे–या साहित्यांची बिले झाली आहेत का? ती जर दिली नसतील तर, जोपर्यंत मा.महा.आयुक्त यांचेकडून याबाबतची चौकशी होत नाही तोपर्यंत ही बिले शिक्षण मंडळाने देऊ नयेत.

मा.राहूल तुपेरे–हे साहित्य विकत घेण्यापूर्वी शिक्षण मंडळाकडून साहित्याच्या दर्जाची तपासणी होत नाही का? याबद्दल माहिती द्यावी.

मा.अविनाश बागवे–मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळ बजेट सभेमध्ये शिक्षण प्रमुखांना एकाही मुद्दयाबाबत नीट स्पष्टीकरण देता आले नाही. परंतु वेळेचे बंधन होते त्यामुळे आम्ही ते मान्य केले होते. त्यावेळी मा.जगताप, अति.महा.आयुक्त यांनीच सर्व मुद्दयांची उत्तरे दिली होती.

मा.राहूल तुपेरे–शिक्षणप्रमुखांना कोणकोणती जबाबदारी दिली आहे? ती जबरदस्तीने दिली असल्याचे वाटत आहे. त्यांच्याकडून कोणते काम होत आहे ते पहावे. त्यांना जी जबाबदारी दिली आहे ते ती पार पाडतात का? ते पहावे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–शिक्षणप्रमुखांनी हा गणवेश हाताळून याच्या दर्जाची पाहणी करावी आणि याबाबत माहिती द्यावी.

मा.बबनराव दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, यामध्ये जे अगोदर मान्य झाले होते त्याची व सॅम्पल्सची तुलना करून तपासणी करू.

(सभागृहात गोंधळ होता)

मा.राहूल तुपेरे–साहित्य ताब्यात घेताना पाहणी केली नाही का? मा.आयुक्त साहेब, शिक्षण मंडळाच्या कामकाजावर पहिल्यापासूनच संशय आहे आणि हे शिक्षणप्रमुख आल्यापासून जास्तच शंका येत आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–तुम्ही हा दिलेला आणि एकदा धुतलेला शर्ट आणि हा नवीन शर्ट दोन्हीं पहा.

मा.सौ.मुक्ता टिळक–रंगात सुध्दा बदल झाला आहे. हा गणवेश पी.टी.चा आहे का?

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–हा रेग्युलर आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–मग दोन्ही रंगामध्ये फरक कसा काय?

मा.राहूल तुपेरे–साहेब, विद्यार्थी गरीब आहेत म्हणून फसवित आहात का? याबद्दल उत्तर द्यावे.

मा.महा.आयुक्त–मा.अध्यक्षा महोदया, आज हे जे सॅम्पल आपल्यासमोर आहे त्याची तपासणी लॅबकडून करून घेणारच आहोत परंतु हा विषय इथपर्यंतच नसून पुढील वर्षाची खरेदी स्टोअर खात्याकडून करणार आहोत आणि हे खरेदी करताना आपण जो निर्णय घेतला आहे की, आपण हे कापड वस्त्रोउद्योग महामंडळाकडून घेतले आणि त्यानंतर आपण फक्त शिलाईचे कॉन्ट्रॅक्ट दिले होते. यावर्षी तसे न करता, यामध्ये ज्या दर्जेदार कंपन्या आहेत उदा.रेमंड, विमल, मफतलाल अशा किंवा समकक्ष कंपन्यांची यादी तयार करून आपण ते टेंडर जानेवारी महिन्यामध्ये करीत आहोत. सुदैवाने शिक्षण मंडळाचे बजेट फायनल झालेले आहे आणि त्याप्रमाणे करून उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये त्या टेलरचे शॉप संबंधीत शाळेमध्ये लावून, ठराविक काळामध्ये मुलांचे गणवेशाचे माप घेऊन ते काम होऊन जाईल आणि मग त्यांना हे शाळेला येण्याच्या पूर्वीच्या दिवसापर्यंत उपलब्ध होऊ शकेल. आता हे सगळे खाजगी शाळेमध्ये करीत आहेत. यामुळे मुले पहिल्या दिवशी गणवेशामध्ये येतील आणि फक्त प्रातिनिधीक स्वरूपात काही ठिकाणी वाटपाचा कार्यक्रम करू शकतो. मात्र प्रत्येक विद्यार्थी किंवा विद्यार्थीनी

गणवेशामध्येच शाळेमध्ये येईल. मी आता जर टेंडर काढले तर ते मार्चपूर्वी फायनल होईल आणि त्यानंतर सर्व शाळानिहाय टेलरिंग कामासाठी प्रोग्रॅम लावणार आहोत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–प्रत्येक शिक्षकाने फक्त माप न घेता नंबर सुध्दा दिला पाहिजे.

मा.महा.आयुक्त–यावर्षी आपण माप घेण्याची कार्यवाही ऑलरेडी सुरू केली आहे वर्गामध्ये माप घेण्याचे काम सुरू आहे आणि आपण त्याप्रमाणे टेंडर काढणार आहोत. यावर्षी आपण एप्रिलनंतर टेंडर काढले होते ती आपल्याकडून चूक झाली होती. आपण एप्रिलची वाट बघण्याचे कोणतेही कारण नाही. शिक्षण मंडळाचे बजेट फायनल झालेले आहे जरी आपले बजेट फायनल झालेले नसेल तरी आपण शिक्षण मंडळाचे बजेट आपण आतापासून करणार आणि सगळे कॉन्ट्रॅक्ट मार्चपर्यंत फायनल करायचे आणि एप्रिल मध्ये काम सुरू झाले तर शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांना गणवेश उपलब्ध होतील.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–आमची आणखी एक विनंती आहे की, आपण जे अन्न तयार करतो ते सेंट्रलाईज्ड करावे.

मा.महा.आयुक्त–यामध्ये कोर्टाच्या काही अडचणी आहेत.

मा.अविनाश बागवे–डिस्ट्रीब्युशन मध्ये अडचणी येतात म्हणजे वारजे येथील संस्थेला काम मिळाले तर ते वडगाव शेरीला कसे पाठविणार? अशा अडचणी येतात.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–यामुळे त्याचा दर्जा चांगला राहू शकतो.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हे सेंट्रलाईज्ड करण्यामध्ये, पुणे शहराचा एरिया छोटा नाही. हे समजून घ्या म्हणून साधारण ५ कि.मी.च्या आतमध्ये किंवा ३ कि.मी.च्या आतमध्ये ते सेंटर निश्चित करून हे काम करावे.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–४ बाजूला ४ सेंटर्स करावीत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–आपल्याकडे खूप जागा उपलब्ध आहेत.

मा.अविनाश बागवे–आता ते तसेच आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–नाही, आपण हे दुसऱ्यांना देतो त्याऐवजी आपणच करावे. यामध्ये ज्या संस्था आहेत त्यांना तिथे काम द्यावे.

मा.सौ.मुक्ता टिळक–त्यामुळे ते बचतगटाला परवडत नाही.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–पुणे शहराचे ४ भाग केले तरी वाहतूक करताना शिजवलेले अन्न थंड होणार त्यामुळे ते साधारण ३ कि.मी.अंतरामध्येच करावे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–मग अशी १२ सेंटर्स करावी आणि पोषण आहारातील फूडचा दर्जा कसा असतो? हे तुम्ही पाहिलेले आहे.

मा.अविनाश बागवे–मा.आयुक्त साहेब आपण आता गणवेशाच्या बाबत विमल कं., रेमंड कं.याबाबत सांगितले आहे. दरवर्षी तेच असते. कपड्याच्या नमुन्याबाबत सुध्दा तसेच सांगतात आणि लॅबमध्ये पाठविताना ठराविक नमुने पाठवितात आणि प्रॅक्टीकली देताना वेगळे करतात.

मा.महा.आयुक्त–मागील वर्षी रेमंड इ.कंपनी नव्हती. ते शासनाच्या वस्त्रोद्योग महामंडळाकडून घेतले होते.

मा.अविनाश बागवे–आपण महामंडळाकडून असे कापड घेतले?

मा.मुकारी आण्णा आलगुडे–प्रत्येक वर्षी अशी प्रकरणे होतात यावर आपण कोणीतरी देखरेख केली पाहिजे.

मा.महा.आयुक्त–यावर्षी आपण उच्चोत्तम स्पेसिफिकेशन्स टाकून आपण कापड घेऊ.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–मा.मुख्यसभेमध्ये मा.सभासदांनी विद्यार्थ्यांचे फाटलेले बूट आणून दाखविले होते. यावर कोणीतरी नियंत्रण ठेवले पाहिजे. मा.आयुक्त साहेब, माझा दुसरा मुद्दा आहे की, आम्ही निषेध केला होता तरी सुध्दा ते साहित्य तिथेच पडलेले होते. ते साहित्य तिथून का उचलले नाही? ते साहित्य तिथून उचलले पाहिजे आपल्या खात्यात आणून ठेवले पाहिजे आणि त्यांनी ते सोडवून नेले नाही तर त्याचा लिलाव केला पाहिजे. अतिक्रमण कारवाईतून आणलेले साहित्य तिथेच पडलेले असते. माल सोडविल्यानंतर संबंधीत व्यक्ती पुन्हा अतिक्रमण करते आणि पुन्हा आपण कारवाईला जायचे.

मा.महा.आयुक्त–फक्त तिथेच नव्हे तर जवळपासच्या सर्व भागामध्ये कारवाई झाली होती आणि त्यांनी ते कालच उचलायला पाहिजे होते आणि आपण तिथे पोलिसांचे मदत केंद्र सुध्दा उभारत आहोत.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–ते पोलीसांच्या ताब्यात देऊन टाका म्हणजे तिथे कोणी जाणार नाही.

मा.महा.आयुक्त–त्या जागेवर पोलिसांचे आरक्षण आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हे सगळे करायचे आहे मग हे कोणी करायचे?

मा.महा.आयुक्त–हे पोलिसांनी करायचे आहे. आपल्याकडे ऑक्ट्रॉयचे जे पोस्ट आहे ते तिथे बसवून पोलिसांचे मदत केंद्र सुरू करीत आहोत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेता–आम्ही त्याबाबीचा निषेध केला होता आणि येथून पुढे जर प्रशासकीय माणसावर जर का हल्ला झाला तर ते सहन करू नये. एवढे मात्र लक्षात ठेवावे.

मा.अध्यक्षा–शिक्षण मंडळासाठीच्या साहित्यांचे कलर कॉम्बीनेशन पाहून आम्ही ते सिलेक्ट करून ठेवले आहे हे साहित्य कोठीमार्फत घेणार आहेत का? याबाबत माध्यमिक शिक्षण विभागाने माहिती द्यावी.

मा.महा.आयुक्त–माध्यमिक विभागाच्या बाबतीत आम्ही मध्यम मार्ग काढला होता आणि इथे सुध्दा दोन तास काम करण्याबाबत सांगितले होते.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–काल अतिक्रमण कारवाई झाली ती अत्यंत चांगली बाब झाली परंतु त्या ठिकाणी जे साहित्य आहे ते ताबडतोब ताब्यात घ्या.

मा.महा.आयुक्त–ती कार्यवाही करतो.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–दुसरी बाब अशी की, हे बेकायदेशीर थाटले होते आणि त्याने पुन्हा बेकायदेशीर केले तर त्याबाबत आपले धोरण काय असेल?

मा.महा.आयुक्त–आम्ही कारवाई करून गुन्हे दाखल करू.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण ही कारवाई करताना गव्हाबरोबर किडे सुध्दा रगडले आहे त्याचे कारण असे आहे की, आपण नॅशनल गेम्सच्या वेळी काही स्टॉल धारकांचे पुनर्वसन केले होते ते पुनर्वसन सुध्दा सगळे चिरडून टाकले. यामध्ये ९३–९५ चे लायसेन्सधारक होते.

आपण काय करायला निघालो आहोत? एकाचा राग, एकाने केलेले दुष्कृत्य आणि त्यामुळे सगळयांवर वरवंटा फिरविला आहे. ही बाब सुध्दा लक्षात घेण्यासारखी आहे.

मा.अविनाश बागवे–सरसकट मध्ये हे झाले, आम्ही हे समजू शकतो.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (वि)–त्यामध्ये काही लोकांनीच पैसे भरले आहेत आणि काहींनी हद्दीवरच ठेवले आहे. तसेच २०१३ मध्ये त्यांना नोटीसा दिल्या होत्या की, हे सर्व बी.आर.टी.मध्ये येत आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते पूर्वीचे लायसेन्सधारक होते म्हणून त्यांचे पुनर्वसन केले होते आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांना १५ दिवसांची संधी द्यायची होती आणि त्यानंतर ते तोडले असते तर ते कायद्याच्या व मानवतेच्या दृष्टीने योग्य झाले असते. परंतु आज आपण काय केले आहे? आपण कायदा पाळला आहे की नाही? यामध्ये त्यांचे कोणत्या आकसाने तोडले आहे का? त्यांचे पुनर्वसन होणार आहे, अशी त्यांना नोटीस दिली होती का?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (वि)–रस्त्यामध्ये येत आहे ते काढून घ्या, अशी नोटीस दिली होती.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यांचे पोटपाणी त्यावर असेल तर त्याने काय करावे?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (वि)–करायचे असेल तर रस्ता आणि फूटपाथ सोडून करावे लागेल.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–तुमच्या नियमात जे काही असेल ते करा. पण त्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक होते त्यांच्यावर जुलूम झाला असे आमचे म्हणणे आहे.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (वि)–आपले बी.आर.टी.चे प्लॅनिंग, २००६–०७ साली झालेले आहे आणि प्रत्यक्ष आखणीमध्ये सन २०१३ मध्ये जी अडचण आली सन २०१३ पासून त्याबाबत प्रोसेस चालू आहे एवढेच नव्हे तर त्या ठिकाणी काही स्टॉलधारक होते त्यांनी मागील आठवड्यात पैसे भरले आहेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्या लोकांना नोटीसा मिळालेल्या आहेत. हे काढले जाणार आहे म्हणून त्यांच्याकडून पैसे भरून घेतले नाहीत. सर, तुम्ही हे समजून घ्या. ही वस्तुस्थिती आहे आणि तरीही आपण असे म्हणता की, त्यांनी पैसे भरले नाहीत. एका बाजूला पैसे भरून घ्यायचे नाहीत आणि दुसऱ्या बाजूला असे म्हणायचे की, त्यांनी पैसे भरले नाहीत. ही थोडी विसंगती आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे आता सुध्दा तुम्हाला त्यांचे विनाशर्त पुनर्वसन करणे आवश्यक आहे. योग्य वाटेल त्याठिकाणी करा आणि त्यांना वाऱ्यावर सोडू नका, एवढीच आमची विनंती आहे.

मा.अविनाश बागवे–मा.आयुक्त साहेब, आम्ही काल आमच्या भावना श्रीमती कळसकर यांच्याकडे व्यक्त केल्या होत्या आणि आम्ही याबाबत प्रशासनाच्या सोबत आहोत. परंतु नाण्याची दुसरी बाजू सुध्दा पाहणे आवश्यक आहे की, आज जर त्याठिकाणी १३ वर्षे अतिक्रमण असेल तर हे सुध्दा चुकीचे आहे आणि एका छोट्याशा गोष्टीला आपण किती वाढवितो? आपण किती खतपाणी घालतो? याचा आपण सुध्दा विचार केला पाहिजे. मी तीन चार सभेत हा विषय सांगत आहे. आपण माझ्या प्रभागात पाहणी केली होती. महानगरपालिकेने टेंडर काढून तयार केलेले वेटींग शेड, आपल्या शब्दानुसार काढून घेतले कारण तो रस्ता मोकळा करायचा होता परंतु आज त्या रस्त्याची अवस्था काय आहे? त्या रस्त्यावर किती मोठ्या प्रमाणात अतिक्रमण आहे, हे आपण कोणीच पाहिले नाही आणि त्यावर काहीच केले नाही. तसेच सापिका शाळेजवळील छोट्या स्नॅक्स सेंटरबाबत आम्ही तक्रार केली. ते सुध्दा अद्याप उचलले नाही. तो इसम सुरूवातील स्नॅक्स टेबलवर मांडत असे, नंतर त्याने छत टाकले आणि आता त्याने त्या बाजूला बाकडे आणि खुर्च्या मांडल्या आहेत म्हणजेच हळूहळू त्याचे सुध्दा हॉटेल मध्ये रूपांतर होईल आणि त्यानंतर आपल्याला जाग येते. ही गोष्ट चुकीची आहे. तसेच आमच्या प्रभागातील सावित्रीबाई फुले स्मारकाच्या समोर एक देशी दारूचे दुकान आहे आणि त्या दुकानाच्या बाजूला अनधिकृत बांधकाम आहे. तेथे रस्त्यावर व्यसनी लोक चुकीची कृत्ये करतात आणि आपण त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत आहोत. आपण कोणत्या गोष्टींना आळा घातला पाहिजे, आपण काय केले पाहिजे? याचे सुध्दा आपल्याला भान नाही आणि या गोष्टींकडे आपण दुर्लक्ष करतो म्हणून या गोष्टी वाढतात.

मा.महा.आयुक्त–मा.अध्यक्षा, महोदय, हे खरे आहे की, आपण एखाद्या ठिकाणी वर्षानुवर्षे कारवाई केली नाही तर त्यांचे धाडस वाढणार आणि यामुळे ज्या घटना घडणार त्याचे प्रमाण वाढणार त्यामुळे आपण जर तेथे दर १५ दिवसांनी कारवाई केली तर तो माणूस असे कृत्य करण्यापूर्वीच विचार करेल आणि तरी सुध्दा ते केले किंवा काल जो प्रकार झाला तो पुन्हा करणार नाही. त्यामुळे आता आम्ही सर्व झोनल कमिशनर्स आणि वॉर्ड ऑफिसर्सकडून दर मंगळवारी या गोष्टींचा आढावा घेणे चालू केले आहे. यापूर्वी आपण दरमहा किंवा जेव्हा शक्य होईल तेव्हा घेत होतो परंतु आता पोस्टर, बॅनर, अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम इ.चा दर मंगळवारी आढावा घेत आहोत आणि प्रत्येकाला उदिष्ट दिले आहे की, त्यांनी ते किती करावे? आणि काय करावे? आणि त्याप्रमाणे महिन्याचा चार्ट आम्ही आता पोलिसांना देत आहोत. आपल्याला पोलिसांकडून अतिरिक्त फोर्स प्राप्त होत आहे आणि त्यांची क्वीक रिस्पॉन्स टीम त्या त्या दिवशी देण्याचे त्यांनी कबूल केलेले आहे. त्याप्रमाणे आता कारवाई होणार आहे. ही कंटीन्यूटी अशी पाहिजे की, १५ दिवसात एकतरी कारवाई झाली पाहिजे आणि पुढील १५ दिवसात पुन्हा तेथे ते बसले तर पुन्हा त्यांच्यावर कारवाई होईल आणि यामुळे हे पूर्णपणे उध्वस्त करण्यास सोपे होणार आहे.

मा.अविनाश बागवे–मी आपल्याकडे व्हॉटस अपवर क्लीप पाठविली होती.

मा.महा.आयुक्त–मी ती त्याच दिवशी संबंधीत अधिकाऱ्यांकडे पाठविली आहे.

मा.अविनाश बागवे–ते काय होते?

मा.महा.आयुक्त–ते वादावादीचे होते.

मा.अविनाश बागवे–नाही, आपण ते पाहिले यामध्ये जे संबंधीत व्यक्ती होत्या त्यांनी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ केली होती त्यांना पोलीस इन्स्पेक्टरने गाडीत डांबून सोबत नेले. जो व्यक्ती बोलत होता त्याला घेऊन गेल्यानंतर सुध्दा आपल्या अतिक्रमणचा स्टाफ, आपले निरीक्षक तिथेच थांबून राहिले. त्यांनी कोणतीच कारवाई केली नाही. ते निघून गेले. तो व्यक्ती अडथळा आणत होता तर पोलीसांनी त्यांची कारवाई केली. त्यावेळी पी.आय.सोबत मी स्वत: बोललो आणि त्यावर त्यांनी असे सांगितले की, जो कायदा व सुव्यवस्था बिघडवितो त्यांच्यावर आम्ही कारवाई केली आहे आणि मग आता आमच्या पोलीस हवालदार आणि शिपायांनी ते शेड काढावे, अशी तुमची इच्छा आहे का? तुमचे महानगरपालिकेचे प्रशासन काहीही करत नाही ते फक्त पाहून गेले. आम्ही तुमच्या शब्दाखातर शांत राहिलो तुम्ही तेव्हा असे सांगितले की, नंतर करू. परंतु आमच्या गरड साहेबांनी आम्हाला असे सांगितले की, मी त्या निरीक्षकाला इन्स्ट्रक्शन्स दिल्या आहेत की संबंधीत इसम कुठेही फिरला किंवा वॉर्ड ऑफिसकडे येत असल्यास, तू कारवाई कर. त्यांनी याबाबत किती वेळा आढावा घेतला याबद्दल काहीच माहिती नाही. प्रशासन नक्की कोणाच्या दबावाखाली काम करते, हे आम्हाला कळत नाही आणि आवश्यकता नाही की,तुम्ही दररोज

जाऊन भांडण करा. तुमच्याकडे कायदा आहे तुम्ही गुन्हे दाखल करा. गुन्हे दाखल करण्याच्या बाबतीत आपले प्रशासन साधा अर्ज करून तिकडे पाठविते परंतु याबाबत पोलीसांचे ठाम असे आहे की, कायद्यानुसार तुमचा माणूस बसला पाहिजे मग पालिकेचा क्लार्क असो, जे.ई.असो किंवा जो कोणी वरिष्ठ अधिकारी असो त्यांनी इथे बसून तक्रार दिली पाहिजे आम्ही एफ.आय.आर.घेतो ते फक्त अर्ज पाठवितात आणि त्यानुसार आम्ही कारवाई करीत नाही. आम्ही याबाबत अनेकवेळा क्षेत्रिय कार्यालयांना व झोनल कमिशनरला सुध्दा सांगितले परंतु ते तसे करीत नाहीत. नुसते हो म्हणतात आणि गप्प बसतात यामुळे हे असे प्रश्न निर्माण होतात.

मा.महा.आयुक्त–यामधून जे समोर येते आहे त्यासाठी आपण आता वॉर्ड अधिकारी, पी.आय., झोनल कमिशनर, अतिक्रमण खाते आणि बांधकाम यांची एक सयुंक्त बैठक आयोजित करू आणि शक्य झाल्यास पोलीस आयुक्त साहेबांना सुध्दा बोलावू तसेच त्यावेळी आपण आपल्या वकीलांना सुध्दा बोलावू कारण ज्या कारणास्तव या बांधकामांना स्टे मिळतो किंवा जे काही होते त्याबद्दल चर्चा करू आणि हे येत्या १५ दिवसांमध्ये आयोजित करू आणि दोन तासांच्या सेशनमध्ये हे सगळे मुद्दे घेऊ.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–कुसाळकर पुतळयाजवळ अनेकवेळा वाढदिवसाचे पोस्टर्स लावले जातात आणि त्यामुळे अनेकवेळा पुतळा झाकला जातो आणि आपले लोक तेथे कारवाई करीत नाहीत. ज्या व्यक्तीचा वाढदिवस असतो त्याच्यावरच कारवाई करा.लोकांनी पुतळयाची तरी कदर केली पाहिजे.

मा.सौ.मुक्ता टिळक–ही आयडिया फार चांगली आहे.

मा.अविनाश बागवे–यासाठी आमच्या वॉर्ड ऑफिस मध्ये बैठक झाली होती आणि अशा स्पॉटवर आपल्या लोकांमार्फत महानगरपालिकेची माहिती लावावी, आपल्या महानगरपालिकेचा फलक लावावा. यासाठी आम्ही पैसे उपलब्ध करून दिले आणि आम्ही आमच्या वॉर्ड ऑफिसरकडे दोन वर्षापासून पाठपुरावा करीत आहोत आणि ते असे कारण सांगतात की, ठेकेदार फोन घेत नाही.

मा.महा.आयुक्त–मी या सगळया गोष्टी मान्य करतो आणि स्मारकासमोरील कारवाई करू.

मा.अविनाश बागवे–एखादे घर असेल तर ठीक आहे परंतु देशी दारूच्या दुकानासमोरील अनधिकृत बांधकाम पाडलेच पाहिजे.

मा.सौ.मुक्ता टिळक–अद्वितीय पुणे असे फ्लेक्स लावा.

मा.सौ.दिपाली ओसवाल–आमच्या बिबवेवाडी भागात तर कारवाईच होत नाही.

आमच्या भागात इतका विरोध आहे की, लोकशाही दिनामध्ये महिलांनी याबाबत तक्रार दिली आहे.

मा.गरड,उपायुक्त (परिमंडळ क्र.३)–दारूच्या दुकानाला एक्साईज डिपार्टमेंटचे लायसेन्स असते.

मा.अविनाश बागवे–रस्त्यांवरील बांधकाम आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तिथे जे गेट असेल तर ओढून काढा.

मा.गरड,उपायुक्त (परिमंडळ क्र.३)– काढतो.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.आयुक्त साहेब, आता अधिकाऱ्यांनी उत्तर काय दिले? ते तुमच्या लक्षात आले का? मा.बागवे साहेबांनी असे विचारले होते की, त्या दारूधंद्यासमोरचे शेड काढले नाही? तर आपले अधिकारी असे उत्तर देतात की, ते एक्साईज डिपार्टमेंटचे काम आहे.

मा.गरड,उपायुक्त (परिमंडळ क्र.३)– मी काम, असे म्हंटले नाही. त्यांना एक्साईज डिपार्टमेंटचे लायसेन्स आहे, असे म्हंटले होते.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते कुठे आहे? ते रस्त्यावर आहे का?

मा.राहूल तुपेरे–सगळी अर्धवट उत्तरे देत आहेत.

मा.अविनाश बागवे–हे काय चालू आहे?

मा.महा.आयुक्त–तिथे तुमचे दुकान जरी असेल त्यांना लायसेन्स त्या कामाचे आहे दुकानाची जी परवानगी असते ती महापालिकेची असते. त्या बिल्डींगमध्ये महापालिकेच्या परवानगीशिवाय जे अतिरिक्त झालेले आहे, ते आजच पाडावे.

मा.अविनाश बागवे–आतमध्ये दुकान असेल तर आम्हाला कळते की, राज्य सरकारचे लायसेन्स असते. परंतु तरी सुध्दा श्री.रमेश शेलार असताना त्यांनी मंगळवार पेठेतील दुकानाबद्दल पाठपुरावा करून ते बंद केले होते. त्यावेळी नगरसेवक उपोषणाला बसले होते आणि त्यावेळी तो फालोअप कार्पोरेशनने केला होता. तुमच्या माहितीसाठी तुम्ही ती केस पहा. परंतु आमची तशी अपेक्षा नाही ते संबंधीत लोक करतील परंतु जे बांधकाम रस्त्यावर आहे ते तरी पाडू शकतो. आपण एकदा कारवाई केली होती आणि त्यानंतर त्यांनी पुन्हा बांधले आणि आता जास्त पक्के बांधले आहे. आपण गुन्हा सुध्दा दाखल करीत नाही.

मा.महा.आयुक्त–तुम्हाला कलम ५२,५३ सुध्दा माहिती आहे आणि ही आजच्या आज कारवाई झाली पाहिजे. ही कारवाई पूर्वीच व्हायला पाहिजे होती. आपल्याला अशी उत्तरे द्यावी लागली नसती आणि सर्व झोनल कमिशर्स आणि वॉर्ड अधिकारी जे इथे उपस्थित आहेत त्यांनी याचे असे नियोजन करावे कुठलेही अनधिकृत बांधकाम प्रत्येक १५ दिवसांत आपल्या रडारवर आले पाहिजे. जेणेकरून १५ दिवसात सतत कारवाई झाली तर ते परत बसणार नाही.

मा.राहूल तुपेरे–रामकृष्ण मठासमोरील हातगाड्या उचलण्याबाबत मी खूप दिवसांपासून सांगत आहे आणि ४ ते ५ दिवसांपूर्वीच रामकृष्ण मठामध्ये मा.मुख्यमंत्री महोदय आले होते आणि फक्त त्या दिवशीच तेथील हातगाड्या बंद केल्या होत्या आणि ते गेल्याबरोबर संध्याकाळी पुन्हा गाड्या चालू झाल्या आणि त्याठिकाणी अंडाभूर्जीच्या गाड्या आहेत आणि संध्याकाळी,रात्रीच्या वेळी तिथे लोक दारू पितात. मी येथे कारवाई करण्याबद्दल अनेकवेळा सांगितले आणि त्यांनी दोनदा कारवाई केली होती परंतु ते लोक त्या जागेवरून उठतात आणि दुसरीकडे जातात. संध्याकाळी तिथे सगळे बेकायदेशीर चालते.

मा.सौ.मुक्ता टिळक–जेथे जेथे अंडाभुर्जीच्या गाड्या आहेत तिथे अतिशय घाण म्हणजे माणूस उभा कसा राहतो आणि खातो कसा? हेच कळत नाही इतकी घाण असते. शनिवारवाडा परिसरामध्ये सुध्दा असेच आहे. या ऐतिहासिक वास्तूजवळ असे असताना आणि इतक्या वेळेला तक्रार केल्यानंतर त्या गाड्या हलवित नाही आपण यामध्ये विभागणी करावी की, अनधिकृत आणि अतिरिक्त बांधकाम असे करावे यामुळे आम्हाला सुध्दा अंदाज येईल की, तुम्ही कोणती कारवाई करीत आहात. जी सरसकट कारवाई होते त्यामध्ये फक्त हातगाड्यावर पटकन कारवाई होऊ शकते पण अनधिकृत बांधकामांच्या बाबतीमध्ये काय? त्यावरील कारवाईचे काय करणार?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (वि)–या कारवायांच्या बाबतीत प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय निहाय, मॅनपॉवर एकत्रित करून त्यांच्यामार्फत जंगली महाराज रोड पासून बाणेर पर्यंत कारवाई चालू करणार आहोत यामध्ये पोस्टर, बॅनर्स, फेल्क्स काढण्याची कारवाई

करू आणि दुसरी कारवाई म्हणजे मंडई विभागामार्फत कारवाई करणार आहोत आणि तिसरी कारवाई येरवडा भागात करणार आहोत या सर्व कारवाया ७ तारखेच्या आत करणार आहोत. येरवडा भागात तेथील क्षेत्रिय कार्यालयामार्फत बऱ्यापैकी कारवाई झाली आहे आणि आता तेथे ज्या ठिकाणी रोड संपत आला होता आणि तेथे कॉर्नरवर अनधिकृत शेडवर कारवाई करण्यासाठी गेल्यानंतर तेथे आतमध्ये असलेल्या व्यक्तीने दूरध्वनी करून बाहेरील लोकांना बोलाविले आणि आतमध्ये येऊन झटापटी सुरू केली त्यावेळी तेथे जे.सी.बी.आतमध्ये गेला नव्हता.

मा.अविनाश बागवे–पोलीसांचे स्टेटमेंट असे का आहे?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (वि)–त्यांना भूमी जिंदगी विभागाकडून जागा मिळालेली नाही. अनधिकृत बांधकामांना नोटीसा दिल्या असतील तर त्यांना आपण कारवाई मध्ये घेतो.

मा.महा.आयुक्त–आम्ही मा.पोलीस आयुक्त साहेबांना विनंती केली आहे आणि आपला दरमहिन्याला जो कारवाईचा कार्यक्रम असणार आहे त्यासाठी क्वीक रिस्पॉन्स टीम उपलब्ध करून देणार आहेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मागे एकदा मा.दहीभाते साहेबांवर सुध्दा हल्ला झाला होता.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपल्यावर जर असे हल्ले होणार असतील तर, येथून पुढे आपली दहशत निर्माण करा. त्यांचे काहीही ठेवू नका. आम्ही तुमच्याबरोबर आहोत.

मा.अविनाश बागवे–तुम्ही गुन्हे दाखल करा समजा कितीही मोठा कार्यकर्ता असला तर तो शांत होतो.

मा.महा.आयुक्त–यामध्ये ३,४ विषय आहेत. बोर्ड, बॅनर, अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम याबाबत वॉर्डनिहाय, कॅप्टन वडके हॉलमध्ये बैठका आयोजित करू त्यामध्ये मी किंवा मा.अति.आयुक्त असतील आणि त्या भागातील नगरसेवक, तेथील पोलीस अधिकारी, क्षेत्रिय अधिकारी आणि बांधकाम विभागाचे अधिकारी एकत्रितपणे दोन तास बैठक घेऊन आपण ते करू शकतो यामधून असे होईल की, सगळे स्टेक होल्डर्स एकत्र आले तर वेगळा मेसेज जात नाही आणि त्यानंतर १ महिन्यांचा कार्यक्रम तयार करायचा आणि मी जसे सांगितले की, दर महिन्याला प्रत्येक बांधकाम, दोन्ही सत्रामध्ये आले पाहिजे जेणेकरून पहिल्यांदा पाडले आणि पुन्हा दुसऱ्यांदा उभारले तरी सुध्दा ते पाडले पाहिजे, असा कार्यक्रम केला आहे आणि यासाठी आता पोलीसांचा सर्पोट मिळेल. आपण यंत्रणा सुध्दा उपलब्ध करून देऊ यासाठी पुढील वर्षीच्या अंदाजपत्रकात सुध्दा वाढीव तरतूद करून देत आहे आणि यानुसार दोन वर्षाचा एक कार्यक्रम तयार करून कारवाई केली तर शहरातील सर्व बांधकामांवर कारवाई होईल आणि ते रूटीन मध्ये आले तर विषय रहात नाही.

मा.अविनाश बागवे–यामध्ये आणखी एक विषय आहे तो टेक्नीकल आणि आपल्या कार्यक्षेत्रातील आहे. मागील वेळेस मा.मुख्यसभेमध्ये चर्चा झाली की, तुम्ही अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई करता पण हे अधिकृत कसे करणार? त्यासाठी आपण असे ठरविले होते की, ज्या महानगरपालिकेच्या जागा आहेत त्याठिकाणचे स्पॉटस ठरविणार होते. यामध्ये मग ती फूटपाथच्या कडेची जागा असेल, किंवा एखाद्या दुसऱ्या ठिकाणी असेल तर आपण काही ठिकाणी परमिशन देणार, आपण रितसर शुल्क आकारून त्यांना ठराविक वेळेसाठी तीन ते पाच दिवस आणि ७ दिवसांपेक्षा जास्त नाही याप्रमाणे अन्यथा काही लोक एक महिन्यांसाठी सुध्दा बुकींग करून ठेवतील आणि आपले फ्लेक्स लावतील. परंतु हे तांत्रिकदृष्टया कसे करणार? समजा जर नगरसेवकांना त्यांच्या प्रभागात अभय योजना राबवायची असेल तर ती कशी करणार? हे कोणीच अॅफोर्ड करू शकत नाही. दरमहा ५० रू.भरून कोणते नगरसेवक हे करणार? आणि समजा जर दमदाटी केली तर तो विषय सुध्दा वेगळा होईल की, आकाशचिन्हचे लोक तक्रार करणार की, सभासद आम्हाला दमदाटी करतात म्हणून जे स्पॉटस आहेत त्याठिकाणी लिगल परमिशन द्या. तुम्ही त्यांच्याकडून पैसे घ्या त्यामुळे काही लोक तरी तुमच्या चॅनल मध्ये येतील निदान एक पध्दत तरी लागेल. आम्ही त्यासाठी विनंती केली होती की, सगळयांना २२२ रूपयांना आणि सगळयांनी २ हजार रू.चा फेल्क्स पण करायचा आणि त्यासाठी २० रू.भाडे भरायचे, हे असे कोणीच भरू शकणार नाही म्हणून हे ईलिगल होत आहे. तुम्ही एक काहीतरी ठरवून पॉलिसी करावी. त्यावेळेस काही रस्ते सुध्दा निश्चित केले होते. काही चौक निश्चित केले होते.

मा.महा.आयुक्त–आपण जो मुद्दा उपस्थित केला आहे तो अगदी रास्त आहे आणि आपण पॉलिसी तयार केली आहे येत्या महासभेला पण ती पॉलिसी सादर करणार आहोत ती मंजूर झाल्यानंतर पूर्ण शहरामध्ये इंम्पिलिमेंटेशन होईल. आपण जो दुसरा विषय जो मिळकतकराचा होता. त्याबाबत आम्ही सर्व सन्माननीय सभासदाना पत्र पाठविले आहे आणि यामुळे तुमच्या सहकार्याने महापालिकेचे उत्पन्न सुध्दा वाढेल आणि त्यामुळे आपण कामे करू शकू. आपण जर आपआपल्या भागामध्ये जनजागृती केली तर त्याचा आपल्याला भरपूर फायदा होऊ शकेल.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–जनजागृती करा हा एक प्रमुख भाग आहे परंतु काही ठिकाणी होर्डिंग्जला परवानगी देताना मनपाच्या कामांसाठी महिन्यातील किमान ३ दिवस तरी शिल्लक ठेवावेत. प्रत्येक होर्डिंग्ज धारकांकडील ३ तीन दिवस त्यामुळे आपले जे काही प्रोग्राम असतील ते तिथे हायलाईट करता येतील. आपला प्रत्येक अधिकारी मिळकतधारकांकडे जाऊ शकणार नाही परंतु आपण जर होर्डिंग वर अभय योजनेची जाहिरात लावली तर ते योग्य होईल.

मा.महा.आयुक्त–आपण आता बऱ्याच ठिकाणी लावले आहेत आणि मी स्थायी समितीमध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांना ७० अधिकारी, कर्मचारी उपलब्ध करून दिले आहेत. प्रत्येक अधिकारीनिहाय आजपासून दि.३१ मार्च पर्यंत दररोज टारगेट किती आहे? आणि ही आकडेवारी माझ्याकडे सुध्दा येते. मी आणि अति.महा.आयुक्त यांच्या समवेत मिळकतकर विभागाकडील अधिकारी व इन्सपेक्टर्स यांच्यासोबत बैठक आयोजित केली होती. ती बैठक ३ तास सुरू होती आणि दर १५ दिवसांनी अशी बैठक घेणार आहोत. यावर्षी आपण जेवढे शक्य होईल तेवढे मिळकत कराच्या बाबतीत प्रत्येक घरापर्यंत जाणार आहोत आणि ते एकदा नेट मध्ये आले की, पुढच्या वर्षापासून आपल्याला याचे उत्पन्न मिळायला सुरूवात होईल.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हे इंटरनेटवर टाका.

मा.महा.आयुक्त–हे इंटरनेट,सोशल मिडीया आणि व्हॉटस अपवर चालू आहे.

मा.अविनाश बागवे–हे सगळे बल्क मध्ये सुरू आहे आम्ही सुध्दा एस.एम.एस.केले आहेत. परंतु हे फेलक्स मुळे सुध्दा योग्य होईल. यासाठी मा.सभासद पैसे भरतील त्यातून हे करा. तुम्ही महानगरपालिकेच्यावतीने लावणार आहे. यामध्ये मा.महापौर असतील, मा.आयुक्त असतील हे तुम्ही करू शकता परंतु हे सभासदाना सुध्दा लागू करावे. आम्ही हे पैसे भरून करतो याची प्रोसेस फक्त व्यवस्थित करा. वाहतूक विभागाची एन.ओ.सी.आणावी, अशी बंधने आणू नयेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आता इ.१ लीचे प्रवेश सुरू होणार आहेत. यामध्ये ज्युनिअर के.जी.साठी वयाची अट किती आहे? याबाबत माहिती द्यावी.
मा.बबन दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.चेअरमन, दि.२१ जानेवारी२०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे सन २०१६–१७ ला ५ वर्षे पूर्ण असावीत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मी ज्युनिअर के.जी.चे विचारले आहे.
मा.बबन दहीफळे,शिक्षणप्रमुख–ज्युनिअर केजीसाठी तीन प्लस, म्हणजे तीन अधिक पाहिजे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–तुमच्या तारखा ठरलेल्या आहेत.
मा.बबन दहीफळे,शिक्षणप्रमुख–होय.
मा.बापूराव कर्णे गुरूजी– अमूक एका तारखेपर्यंत जन्म असावा, असे ठरविले आहे.
मा.बबन दहीफळे,शिक्षणप्रमुख–तारखा ठरविलेल्या नाहीत, वय वर्षे ठरविले आहे आणि सध्या पहिली साठी सिक्स प्लस आहे.
मा.अध्यक्षा–६ वर्षाचा मुलगा इ.पहिली मध्ये असणार, हा नियम जुना आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी– शिक्षण हक्क कायद्यानुसार, २५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. याबाबतचे धोरण काय असणार आहे? हे राबविण्याची पध्दत काय असणार आहे?
मा.बबन दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.चेअरमन, अगोदर मागील वर्षांचेच काही पेन्डींग आहेत आणि हे संपल्यानंतर हे करायचे आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी– गेल्यावर्षी असे झाले होते की, आपले धोरण निश्चित नसल्यामुळे, या तरतुदीखाली अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही. ही वस्तुस्थिती आहे का?
मा.बबन दहीफळे,शिक्षणप्रमुख–बरोबर आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मग याची प्रसिध्दी करण्याचे काम कोणाचे आहे?
मा.बबन दहीफळे,शिक्षणप्रमुख–हे शासनाचे आहे आणि माझे कोर्ट मॅटर झाल्यामुळे बराच विलंब झाला आहे. यावर्षी लवकर करायचे होते परंतु मागील वर्षाचेच अजून क्लेअर न झाल्यामुळे पुढचे अद्याप बाकी आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.आयुक्त साहेब, मागील वर्षी शिक्षण हक्क कायद्यानुसार जे प्रवेश होणे आवश्यक होते ते झालेले नाहीत. ते पेंडींग आहेत आणि आजही परिस्थिती अशी आहे की, या शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेश देण्याची सिस्टीम काय आहे? हे अद्याप क्लेअर नाही, असे सांगत आहेत.
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (वि)–मा.अध्यक्षा, राज्य सरकारच्या माध्यमातून सेंट्रलाईज्ड सॉफ्टवेअर आहे आणि यातील काही प्रणाली इस्टॅबलिश करण्यात आलेली आहे. त्यांचे जे निकष आहेत त्याप्रमाणे याची अंमलबजावणी डेप्युटी डायरेक्टर ऐज्युकेशन यांच्या माध्यमातून केली जाते. शहरी भागामध्ये यांच्याकरीता लागणारी यंत्रणा महानगरपालिकेच्या माध्यमातून फक्त मॅन पॉवरच्या माध्यमातून पुरविली जाते. या पलिकडे त्यामध्ये आपला काहीही रोल नाही आणि यामध्ये कितीजणांना प्राप्त झाले किंवा नाही झाले किंवा यामध्ये कोर्टामध्ये जी केस झाली तर ती केस राज्य सरकार लढविते आणि त्याबाबत जी संपूर्ण माहिती ती त्यांच्याकडूनच प्राप्त होईल. आपल्याकडे त्यांचे सॉफ्टवेअर नाही. आपण फक्त सहायक शिक्षणप्रमुखांच्या माध्यमातून मॅनपॉवर उपलब्ध करून देतो आणि काही ठिकाणी फक्त काही शिक्षक आपण त्या एरियावाईज, झोनवाईज दिलेले आहेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.आयुक्त साहेब, ही माहिती अशी नुसती तांत्रिक माहिती देऊन जमणार नाही. याठिकाणी पुणे महानगरपालिकेतील सर्व नगरसेवक ज्या त्या पातळीवर, त्या ठिकाणचा पालक वर्ग हा नगरसेवकांकडेच येत असतो. त्यांना, नगरसेवकांना या बाबतची परफेक्ट माहिती शिक्षणप्रमुखांकडून मिळणे आवश्यक आहे. जेणेकरून आम्हाला ते पालकांपर्यंत पोहचविणे सोईचे होईल.
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (वि)–आपण आपल्याकडे झोनलला जी कारवाई करतो. आपण जे प्रत्येक स्तरावर सहायक दिले आहेत. त्या सहायकाच्या अनुषंगाने जी पूर्तता व्हायची असेल ती त्या त्या नगरसेवकांना कळवा. त्यामध्ये आपल्याकडे किती शाळा आहेत? आणि आर.टी.ई.खाली किती जागा भरल्या जाणार आहेत? याबाबत किती प्रोसिजर कार्यवाही केली आहे? आणि त्याची मेरीट लिस्ट डिस्टन्सच्या अनुषंगाने, शिक्षणप्रमुखांनी सर्व सभासदाना ही माहिती द्यावी.
मा.महा.आयुक्त–पुढील ३ दिवसात ही पत्रे सर्व सभासदाना मिळाली पाहिजेत.
मा.अध्यक्षा–आपण सगळया सभासदाच्या मान्यतेने माध्यमिकसाठी जे सिलेक्ट केले आहेत आणि त्यानुसार एक, एक सॅम्पल पीस शिलाई करून दाखवावा. यामध्ये एकेक पॅन्ट–शर्ट आणि एकेक सलवार–कुडता यांचा नमुना तयार करून आणून दाखवावा. त्यांच्याकडून दोन्हींचे नमुने शिलाई करून घ्यावेत आणि ते कसे दिसतील? हे पहायचे आहे आणि ते पूर्ण झाल्यानंतर पुन्हा समितीच्या समोर आणावे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–सॅम्पल कापड आपल्याकडे ठेवून घ्यावे आणि शिलाई झाल्यानंतर कापडाची तपासणी करावी.
मा.महा.आयुक्त–ते ठेवावेच लागते आणि तशी तपासणी होते.
मा.अध्यक्षा–सभा सुरू करावी.
उपनगरसचिव– तहकूब सभा कार्यपत्रिका क्र.४४ सुरू करीत आहोत. त्यानंतर तहकूब सभा परिपत्रावरील विषय घेण्यात येतील.

<u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>

विषय क्र.२०२४/ठराव क्र.२०२४
मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेतली.
**निर्णय–**मा.सह.महा.आयुक्त, स्थानिक संस्था कर यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०२५/ठराव क्र.२०२५
मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेतली.
**निर्णय–**सह महापालिका आयुक्त (परिमंडळ विभाग क्र.४) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०२६/ठराव क्र.२०२६
मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय**–सह महापालिका आयुक्त (परिमंडळ विभाग क्र.४) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०२७/ठराव क्र.२०२७
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण मान्य करू परंतु जनरल बॉडीमध्ये आपण हे मान्य करून देणार आहात का? याची आम्हाला हमी द्यावी.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करा.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–कारण आपले सगळे अखर्चितचे विषय पेन्डींग आहेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करा पुढील आठवड्यात याबाबत मिटींग घेऊ.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०२८/ठराव क्र.२०२८
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०२९/ठराव क्र.२०२९
मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेतली.
**निर्णय**–सह महापालिका आयुक्त (परिमंडळ विभाग क्र.४) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३०/ठराव क्र.२०३०
मा.अध्यक्षा–नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–सह महापालिका आयुक्त (परिमंडळ विभाग क्र.४) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३१/ठराव क्र.२०३१
मा.अध्यक्षा– अहवालाची नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–मा.सह.महा.आयुक्त(मुख्य लेखापरिक्षक) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३२/ठराव क्र.२०३२
मा.अध्यक्षा– अहवालाची नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–मा.सह.महा.आयुक्त(मुख्य लेखापरिक्षक) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३३/ठराव क्र.२०३३
मा.अध्यक्षा– अहवालाची नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–मा.सह.महा.आयुक्त(मुख्य लेखापरिक्षक) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३४/ठराव क्र.२०३४
मा.अध्यक्षा– अहवालाची नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–मा.सह.महा.आयुक्त(मुख्य लेखापरिक्षक) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३५/ठराव क्र.२०३५
मा.अविनाश बागवे–वसूली करावयाची रक्कम किती आहे?
मा.सौ.मुक्ता टिळक–हे ऑडिट उपसमितीमध्ये यायचे आहे.
उपनगरसचिव–हा विषय माहितीसाठी आहे हा अहवाल नाही.
मा.अध्यक्षा–नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–मा.सह.महा.आयुक्त(मुख्य लेखापरिक्षक) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३६/ठराव क्र.२०३६
मा.अध्यक्षा–नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–मा.सह.महा.आयुक्त(मुख्य लेखापरिक्षक) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३७/ठराव क्र.२०३७
मा.अध्यक्षा–नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–मा.सह.महा.आयुक्त(मुख्य लेखापरिक्षक) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३८/ठराव क्र.२०३८
मा.अध्यक्षा–नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–मा.सह.महा.आयुक्त(मुख्य लेखापरिक्षक) यांनी पाठविलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.
विषय क्र.२०३९/ठराव क्र.२०३९
उपनगरसचिव–हा ऑडिट अहवाल आहे.
मा.अध्यक्षा–सदरचा अहवाल ऑडिट उपसमितीकडे पाठविण्यात यावा.
**निर्णय**–सदरचा अहवाल ऑडिट उपसमितीकडे पाठविण्यात यावा.
विषय क्र.२०४०/ठराव क्र.२०४०
मा.बापूराव कर्णे गुरूजी–अभिप्राय वाचून दाखवावा.

उपनगरसचिव–मनपा सेवाविनियम प्रकरण ४ वेतन या सदराखाली २० अ नुसार अशी वेतनवाढ देण्यासाठी हे पद निर्माण असलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे. मेहरबान महाराष्ट्र शासन पुणे मनपा आस्थपनेवरील पदनिर्मिती सक्षम प्राधिकारी आहे तो महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात २०११ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५१ ते पोटकलम ४ नुसार राज्य शासनाच्या पूर्व मंजूरी शिवाय महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कोणतीही नवीन पदे निर्माण करता येणार नाहीत. तसेच वरील बाबत स्पष्टीकरण, वेतनमान किंवा वेतन संरचना यातील कोणतीही सुधारणा किंवा विशेष वेतन किंवा श्रेणी देण्याबाबत किंवा भत्यातील सुधारणा महागाई भत्ता वगळून किंवा पदनामातील बदल हे पोटकलम ४ च्या प्रयोजनार्थ नवीन पदांची निर्मिती असल्याचे मानण्यात येईल, असे निर्देशित केले आहे. महापालिका सभा ठराव क्र.३७८, दि.२४/१/२००३ चे मंजूरीनुसार संदर्भ क्र.३ अन्वये कार्यालय परिपत्रक प्रस्तुत करण्यात आले आहे. त्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल आदर्श सेवक म्हणून राष्ट्रपती पदक, पदके प्राप्त सेवकांना दि.४/३/२००४ पासून एक अग्रीम वेतनवाढ देय होईल, अशी वेतनवाढ संबंधीत सेवकाला दिल्यानंतर मेहेरबान राज्य शासनास पदे निर्माण करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून पश्चात मान्यता घेण्यात यावी. जर मेहेरबान शासनाकडून वरील प्रस्ताव अमान्य झाल्यास संबंधीत अधिकारी/सेवकांना देण्यात आलेली अग्रीम वेतनवाढ व त्या अनुषंगाने वेतनवाढ झालेल्या रकमांची वसूली करण्यात यावी, असे नमूद केले आहे. उपायुक्त (ज) कार्यालय, दि.२१/५/२००४ अन्वये पुणे महानगरपालिकेतील ज्या अधिकारी व सेवकांना उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सर्वोत्कृष्ट सेवक म्हणून राष्ट्रपती पदक म्हणून बहाल करण्यात येतील, अशा अधिकारी सेवकांना एक अग्रीम वेतनवाढ देणेविषयी शासनाची मंजूरी मिळणे विषयी विनंतीचे पत्र पाठविण्यात आलेले असून वेळोवेळी स्मरणपत्रे देण्यात आलेली आहेत. तथापि त्यास अद्यापही मंजूरी प्राप्त झालेली नाही. दरम्यानचे कालावधी मध्ये काही अधिकारी, सेवक सेवानिवृत्त झाले, मयत झाले, खात्याने त्यांना दिलेली वेतनवाढ शासन मान्यतेअभावी वसूल करावी लागली, ही वस्तुस्थिती आहे. फायरमन, श्री.चंद्रकांत नारायण आनंददास यांनी त्यांच्या प्रशिक्षणाचा उपयोग करून व पडलेल्या जबाबदारीचा विचार करून कर्तव्य पार पाडले आहे व त्यांचा उचित गौरव होणे आवश्यक आहे. तथापि वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता वरील वेतनवाढी देण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाच्या स्तरावर किंवा शासनाच्या पश्चात मान्यतेच्या अधीन घेता येणार नाही. प्रकरण ९ वे मनपा सेवानियम ७१ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. विनिमय ७२ ते ७६ यामध्ये केलेल्या शर्तीच्या अधीन नगरपालिकेच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली असलेल्या नगरपालिका कर्मचाऱ्यांस नगरपालिका निधीतून मानधन किंवा फी देण्यास किंवा अशा नगरपालिका कर्मचाऱ्यांने त्यांच्या कर्तव्याच्या क्रमात किंवा बाहेर ज्याबद्दल विशेष बक्षीस देणे असे समर्थनीय ठरेल असे जिकरीचे काम पार पाडल्याबद्दल नगरपालिका निधी व्यतिरिक्त इतर साधनसंपत्तीतून त्या नगरपालिका कर्मचाऱ्याने मानधन किंवा फी स्वीकारणेस मंजूरी देता येईल. अशा मंजूरीविना कोणत्याही नगरपालिका कर्मचाऱ्याने मानधन किंवा फी स्वीकारता कामा नये. वरील तरतुदीनुसार श्री.आनंददास यांना दोन जादा वेतनवाढी देण्याऐवजी बक्षिसरूपाने काही रक्कम देणे, काही रक्कम अदा करणे शक्य आहे. त्यानुसार स्थायी समितीने बक्षिसाची योग्य ती रक्कम निश्चित करून दिल्यास आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाच्या स्तरावर करता येईल.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–स्थायी समितीने बक्षिसाची रक्कम निश्चित करावी परंतु प्रशासनाने काही सूचीत केलेले नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक–तसा स्थायी समितीचा काही संबंध नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–अभिप्राय मान्य आणि याबाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा.

मा.अध्यक्षा–प्रशासनाने नियमाप्रमाणे निर्णय घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाबाबतचा अभिप्राय मान्य, याबाबत प्रशासनाने नियमाप्रमाणे निर्णय घ्यावा.

विषय क्र.२०४१/ठराव क्र.२०४१

उपनगरसचिव–रस्ता रूंदीबाबतचा अभिप्राय आला आहे. तो वाचून दाखवितो.

प्रभाग क्र.२१, कोरेगाव लेन क्र ५ येथे आधीचा १२ फूटाचा रस्ता आहे. साऊथ मेन रोड व नार्थ मेन रोड या रस्त्यांना जोडणारा मुख्य रस्ता असल्याने वारंवार ट्राफिक जाम होत असल्याने सदरचा रस्ता दोन्ही बाजूने मनपा अधिनियम कलम २१० अन्वये २ मीटरने रूंद करण्याकरीता सदर अभिप्राय स्थायी समितीकडे कळविल्याप्रमाणे त्यांच्याकडे सादर करणेस विनंती आहे.

मा.अनिल राणे–हा अभिप्राय मान्य करावा.

**निर्णय**–सदर विषयाबाबत सर्वानुमते अभिप्राय मान्य करण्यात आला.

विषय क्र.२०४२/ठराव क्र.२०४२

उपनगरसचिव–या विषयावर अभिप्राय आला आहे तो वाचून दाखवितो.

स्थायी समिती पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग सन २०१५–१६ चे अंदाजपत्रकातील ४ ब.महिला बालकल्याण योजना निधी अंतर्गत ४९ ब मध्ये रात्रनिवारा प्रकल्प सुरू करणे या अर्थर्शिषकावर २५ लाख तरतूद करण्यात आली आहे. मा.स्थायी समितीने ठराव क्र.१०७८ दि.१५/९/१५ नुसार प्र.४९ ब मध्ये विविध ठिकाणी कॉक्रीटीकरण करणेसाठी र.रू.२५ लाखाचे वर्गीकरण करण्याची आवश्यकता आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा अभिप्राय मान्य करावा.

**निर्णय**–सदर विषयाबाबत सर्वानुमते अभिप्राय मान्य करण्यात आला.

विषय क्र.२०४३/ठराव क्र.२०४३

मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय एक आठवडा पुढे घ्यावा.

मा.अध्यक्षा–या विषयाबाबत मे.हायकोर्टाने दिलेल्या निर्देशाची माहिती द्यावी.

मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–मा.अध्यक्षा, कोंढवा येथे सध्या पारंपारिक पध्दतीने प्राण्यांची कत्तल होते तर त्याप्रमाणे स्लॉटर हाऊस रूल्स २००१ प्रमाणे आम्ही महानगरपालिकेतर्फे मोठ्या प्राण्यांची कत्तल करण्यासाठी यांत्रिक प्लॉन्ट उभा केलेला आहे. सदर प्लॉन्ट हा २००८ पासून वापरात नाही. त्यामुळे सध्या पारंपारिक पध्दतीनेच कार्यवाही होत आहे तर इंडियन स्लॉटर हाऊस रूल्स प्रमाणेच कारवाई व्हावी यासाठी आम्ही मा.स्थायी समिती, ठ.क्र.६६२, दि.१४/८/२०१२ अन्वये आम्ही कत्तलखाना खाजगीकरणासाठी एक प्रपोजल ठेवले होते. परंतु तो ठराव दफ्तरी दाखल झाला आहे. मा.मुख्यसभेने तो ठराव दफ्तरी दाखल केला त्यानंतर ऑल इंडिया जमातूल कुरेशी यांनी मुंबई हायकोर्टमध्ये रिट केले. त्यानंतर मे.उच्च न्यायालयाने महानगरपालिकेस प्रतिज्ञापत्र सादर करणेस विनंती केली. त्यानुसार व मा.आयुक्त साहेबांच्या आदेशाप्रमाणे कत्तलखाना महानगरपालिकाच चालवेल, असे प्रतिज्ञापत्र सादर केले. हे प्रतिज्ञापत्र सादर करताना कत्तलखाना चालविण्यासाठी १०० पदे निर्माण केली गेली आहेत. सध्या प्लॉन्ट वापरात नाही. त्यामुळे तो प्लॉन्ट मेंटेनेन्स मध्ये आणण्यासाठी म्हणजे ऑपरेटीव्ह करण्यासाठी टेंडर काढण्यात आले आहे. त्यामध्ये प्लॉन्टचा जो मेंटेनेन्स आहे आणि मनपाचे जे सेवक असतील त्यांना ट्रेनिंग देण्यासाठी सुरूवातीला हे टेंडर काढलेले आहे आणि ते एकदा ऑपरेटीव्ह झाले तर ते महानगरपालिकेकडे परत सुर्पूद होणार आहे म्हणजे थोडक्यात आम्ही लेबर कॉन्ट्रक्ट आणि मेटेनेंन्स कॉन्ट्रक्टचाच हा विषय आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपण हे खाजगी संस्थेला देत आहोत का?

मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–होय.

मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय एक आठवडा पुढे घ्यावा.

मा.अध्यक्षा–आपण आता हा विषय एक आठवडा पुढे घेऊ पण थोडक्यात तुम्हाला हे करणे बंधनकारक आहे.

मा.डॉ.परदेशी(आरोग्यप्रमुख)–होय.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–हायकोर्टाने आपल्याला हे बंधनकारक केले आहे आणि आपल्याकडे आधुनिक उपकरणे असताना सुध्दा प्राण्यांची कत्तल पारंपारीक पध्दतीने होत आहे आणि आपल्याला पुन्हा कोर्टमध्ये निवेदन करावे लागेल की, आम्ही हा प्लॉन्ट ऑपरेशनल केलेला आहे आणि त्यानंतर महानगरपालिका स्वत:हून करणार आहे.

मा.अध्यक्षा–म्हणजेच कोर्टाच्या आदेशानुसार तुम्हाला हे बंधनकारक आहे. हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.२०४४/ठराव क्र.२०४४

मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय मान्य करावा.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.२०४५/ठराव क्र.२०४५

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.२०४६/ठराव क्र.२०४६

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.२०४७/ठराव क्र.२०४७

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.२०४८/ठराव क्र.२०४८

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.२०४९/ठराव क्र.२०४९

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा आणि जोपर्यंत पाण्याचा प्रश्न..

मा.बापूराव कर्णेगुरूजी–आपल्याकडे जोपर्यंत पाण्याचा पुरेसा पुरवठा होत नाही. तो पर्यंत हा विषय मान्य करू नये.

उपनगरसचिव–मा.अध्यक्षा, हा विषय १ महिन्यानंतर घ्यावा, असा निर्णय देता येईल.

मा.अध्यक्षा–पाणीटंचाईचा प्रश्न सुटेपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा.

मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय एक महिना पुढे घ्या, कारण तसे करता येत नाही.

मा.अध्यक्षा–ठीक आहे.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार एक महिन्यांनंतर करावा.

विषय क्र.२०५०/ठराव क्र.२०५०

मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.२०५१/ठराव क्र.२०५१

मा.मुक्ता टिळक–हा विषय मान्य करावा.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करावा.
विषय क्र.२०५२/ठराव क्र.२०५२
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे वर्गीकरण कशाचे आहे?
मा.किशोर पोळ, कार्य.अभि.(वाहन विभाग)–हे खात्यातील खात्यात स्पेअर पार्ट, सकीर्ण, स्वच्छता आणि दुरूस्ती व भाडे तत्वावर घेतल्या गाडयांसाठीचे या खर्चासाठी हे वर्गीकरण आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या विषयाची माहिती घ्यायची आहे त्यामुळे हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.२०५३/ठराव क्र.२०५३
मा.मुक्ता टिळक–हे काय आहे? याबाबत माहिती द्यावी.
मा.कंदूल, कार्य.अभि.(कोठी)–हे ५० टक्के वाढीव खरेदीचे डॉकेट आहे.
मा.मुक्ता टिळक–आपले इस्टीमेंट चुकले आहे का?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–आपण टेंडर काढलेले आहे पण टेंडरचा दर जास्त आलेला आहे. तो ८५०० रू.इतका आला आहे त्यानंतर त्यांच्याबरोबर निगोशिऐशन्स करून र.रू. ३०० ने कमी करून हा दर ८२०० रू.इतका आला आहे. पण जुना जो दर आहे तो ८०२०/–रू. आहे. हे आपण मनपाच्या हितासाठी आपण ५० टक्के वाढीव करीत आहोत आणि ५० टक्के वाढीव काम पूर्ण झाल्यानंतर मग टेंडरचा विचार करू, असे मिटींग मध्ये ठरले होते.
मा.अविनाश बागवे–हे टेंडर कधीचे आहे?
मा.कंदूल, कार्य.अभि.(कोठी)–हे टेंडर गेल्या वर्षीचे आहे. आता जे आणले आहे ते ५० टक्के वाढीचे आहे.
मा.अविनाश बागवे–या टेंडरची तारीख सांगा.
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–हे टेंडर सन २०१४–१५ चे आहे आणि आता जास्त क्रॉन्टटी शिल्लक नाही फक्त ३५० टन आहे आणि दरमहा २९० टन आवश्यक असते त्यामुळे हे आवश्यक आहे. आपण फिल्टरच्या अगोदर तुरटीचे लिफ्ट करतो.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण जुन्याला मुदतवाढ देत आहोत. पूर्वीचा इसम हे करायला तयार आहे का?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–होय, तयार आहेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यांनी कमी दराने का भरले नाही?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–त्यांचेच टेंडर रेट ८५००/–रू.चे आहे. याबाबत मा.बकोरिया,अति.महा.आयुक्त साहेबांकडे चर्चा झालेली आहे.
मा.अविनाश बागवे–आता तुम्ही हे जे सांगितले की, ८५०० रू.चा दर आला आहे. ते कधीचे रेट आहेत?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–ते आताच्या टेंडरचे रेट आहेत.
मा.अविनाश बागवे–यावर्षी टेंडरींग केले होते का?
मा.कंदूल, कार्य.अभि.(कोठी)–होय, यावर्षी टेंडरींग केले आहे.
मा.अविनाश बागवे–मग ते का दिले नाही? ते कुठे आहे
मा.कंदूल, कार्य.अभि.(कोठी)–ते डॉकेट नंतर आणायचे कारण हा सगळा पुरवठा झाल्यानंतर, आपण मनपाचे हित पाहून आपण केले आहे की, आपल्याला ५० टक्के वाढीव करता येते. त्याला हे बंधनकारक आहे. आपण त्याच्याबरोबर ॲग्रीमेंट केलेले असते.
मा.अविनाश बागवे–आमची एवढीच विनंती आहे की, सन २०१४ चे टेंडर आता कंटीन्यु कशाला करीत आहात?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–मघाशी सांगितल्याप्रमाणे आपण जे नवीन टेंडर काढले आहे त्याचा दर ८५०० रू.इतका आला आहे आणि जुन्या टेंडरचा दर फक्त ८०२० रू.आहे. या दरामध्ये बरीच तफावत आहे आणि त्यांना वाढीव ५० टक्के द्यायचे असे आपण ऑलरेडी ॲग्रीमेंट केलेलेच आहे. त्यामुळे तो द्यायला सुध्दा तयार आहे आणि हे मिटींग मध्ये ठरले होते.
हे ॲग्रीमेंट कोणी केले?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–आपण दरवेळेस वर्कऑर्डरच्या अगोदर ॲग्रीमेंट करतो.
मा.अविनाश बागवे–गेल्यावर्षी जर आपल्याला आवश्यकता असेल तर तो ५० टक्के वाढ करून देणार होता पण हे गेल्यावर्षीसाठी होते. मग हे यावर्षी का आणले आहे?
मा.सौ.मुक्ता टिळक–हे टेंडर कधी काढले आहे?
मा.कंदूल, कार्य.अभि.(कोठी)–हे जे डॉकेट आहे ते गेल्यावर्षीचे डॉकेट आहे.
मा.अविनाश बागवे–यावर्षीचे टेंडर कधी काढले?
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–हे दोन्ही कॉन्ट्रॅक्ट वेगवेगळे आहेत.
मा.अविनाश बागवे–त्यांनी दोन्ही सेम असल्याचे सांगितले आहे.
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–दोन्हीकडे स्वानंद आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मग हेच नवीन टेंडर त्या कमी रेटने करण्यास सांगावे.
मा.मुक्ता टिळक–नवीन टेंडर काढले आहे का?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–नवीन टेंडर काढलेले आहे.
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–तो लॉस आहे हा रेट ८५०० रू.आहे. जो जुना रेट आहे तो ८०२० रू.इतका आहे.
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–नवीन टेंडर माहे डिसेंबर २०१५ मध्ये काढलेले आहे.
मा.अविनाश बागवे–संपूर्ण वर्ष गेले आणि २०१५–१६ चे बजेट १५ नंतर इंम्पिलिमेंट करावे, असा रूल आहे का?

मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–हा विषय माझ्या अगोदरचा आहे. मागील सभेत माहिती देण्यासाठी कोणी नव्हते म्हणून माहिती घेऊन आपण आणले आहे.
मा.अविनाश बागवे–मा.आयुक्त साहेब, असे काहीतरी चुकीचे डॉकेट आणू नका. आता जर १५ चे रितसर काढले असेल आणि मा.सभागृहनेत्यांनी जशी सूचना केली की, जुन्या रेटने करून घ्यावे, तसे संबंधितांना सांगावे.
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–त्यासाठी ते तयार नाहीत याबाबत मा.बकोरिया साहेबांनी चर्चा केली होती.
मा.अविनाश बागवे–कारण काय आहे?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–ते असे सांगतात की, परवडत नाही.
मा.अविनाश बागवे–मग इथे कसे परवडते?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–म्हणजे पूर्वी ॲग्रीमेंट केले म्हणून तो करणार आहे का?
मा.मुक्ता टिळक–मग अशा पध्दतीने हा ट्रेंन्ड होईल, मग सगळेच करा. १४–१५ ची माणसे आहेत त्यांच्याकडून १५–१६ मध्ये घ्या आणि त्यामध्ये १०० ते २०० रू.वाढवावेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण त्याच्याशी निगोशिऐन्सस केले आहे का?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–त्यांच्या बरोबर निगोशिऐसन्स केले आहे आणि तो जास्तीत जास्त ८२०० रू.नुसार देत आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–तो टेंडर मुदतवाढीला तयार आहे.
मा.कंदूल, कार्य.अभि.(कोठी)–कारण आपण टेंडर ॲग्रीमेंट मध्ये घेतले आहे.
मा.आयुक्त–स्पेसिफिकेशन मध्ये बदल आहे का?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–नाही, स्पेसिफिकेशन सेम आहे.
मा.अविनाश बागवे–आम्हाला हे लॉजिक कळत नाही.
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–आपण हे ॲग्रीमेंट केले होते आणि ५० टक्के वाढीव बंधनकारक आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–ते पुढे पुढच्या वर्षात कंटीन्यू होते का?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–होय, ६ महिने चालू राहिल.
मा.सौ.मुक्ता टिळक–ते ६ महिने झाले आहेत.
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–नाही आता शिल्लक आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–तुम्ही सन २०१४–१५ मध्ये त्यांच्या बरोबर वाढीवचे ॲग्रीमेंट केले आणि सन २०१४–१५ मध्ये आपल्याला ५० टक्यांची आवश्यकता पडली नाही हे बरोबर आहे का?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–१०० टक्के आता पूर्ण संपत आलेले आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–तुम्ही ॲडीशनल म्हणत आहात का?
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–तुम्ही मान्यता दिली तर आता सुध्दा डॉकेट आणू शकतो.
मा.अविनाश बागवे–डॉकेट मध्ये असे लिहले आहे की, १५६२ मे.टन शिल्लक आहे.
मा.कंदूल,कार्य.अभि.(कोठी)–मी आताची परिस्थिती सांगत आहे.३६० मे.टन आता शिल्लक आहे आणि दर महिन्यांला २९० मे.टन.आवश्यक असते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–म्हणजे एक महिन्याचा माल शिल्लक आहे.
मा.अविनाश बागवे–मा.आयुक्त साहेब, हा विषय मान्य करणे तांत्रिक दृष्टया चुकीचे होईल. आता जे सन २०१५–१६ चे जे टेंडर आहे ते तुम्ही पास करा.
मा.आयुक्त–तो माणूस सेम आहे.
मा.अविनाश बागवे–इतर फॉर्मलिटीज पूर्ण करायला वेळ लागतो.
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–मा.चेअरमन महोदय, आपण जर ही फाईल पाहिली तर मा.अति.महा.आयुक्त यांनी असे म्हंटले आहे की, वेट ॲण्ड वॉच त्यामुळे टेंडर आल्यानंतर निगोशिऐट करण्याचा प्रयत्न केला आणि त्याचे असे म्हणणे आहे की, रिटेंडर करावे आणि त्यामध्ये असे झाले आहे की, त्याला पब्लिसिटी द्यावी, जास्त सर्क्युलेशनच्या पेपरमध्ये जाहिरात देऊ नये, रिटेंडर करण्यात यावे आणि तोपर्यंत सध्याच्या रेटमध्ये सप्लाय होणार नाही.
मा.अविनाश बागवे–हे सगळे सांगत असताना, तुम्ही जर ५ जानेवारीला, आपल्याला हे दर महिन्याला किती आवश्यक असते?
मा.कंदूल, कार्य.अभि.(कोठी)–आपल्याला दरमहा २९० टन आवश्यक असते.
मा.अविनाश बागवे–तुम्ही दि.५ जानेवारी २०१६ रोजी जे डॉकेट ठेवले आहे त्यामध्ये तुम्ही १५६५ मे.टन शिल्लक आहे म्हणजे पुढील ५ ते ६ महिने चालू शकतील. मग मा.अति.आयुक्त साहेब सांगत आहेत तसे रिटेंडरींग करा आणि प्रोसेस पूर्ण करावी.
मा.सौ.मुक्ता टिळक–मग त्यांचे असे पत्र कसे काय आले? त्यांचा अभिप्राय वेगळा आहे आणि पत्र वेगळे पाठविले आहे.
मा.महा.आयुक्त–हे दर ठराविक कालावधीसाठी लागू असतात आणि कालावधी संपला आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–ते १४–१५ चे आहे म्हणजे कालावधी संपला. रिटेंडर करा.
मा.अविनाश बागवे–इतर मोठमोठे टेंडर सुध्दा असेच होतील आणि मग तीच प्रथा पडेल.
मा.अध्यक्षा–त्याला जुन्या रेटने करायला सांगावे.
मा.महा.आयुक्त–नवीन टेंडरचा उल्लेख करून जुन्या रेटने काम द्यायचे.
मा.अविनाश बागवे–तो जर करीत असेल तर ठीक नाहीतर रिटेंडरींग करावे.
मा.कंदूल, कार्य.अभि.(कोठी)–त्यांनी ऑलरेडी पत्र दिले आहे की, हे काम ८०२० रू.ने करतो.

मा.अविनाश बागवे–पण ह्या टेंडरने नाही ते २०१५–१६ चे असले पाहिजे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–तो नवीन टेंडरचा विषय डॉकेटवर येऊ द्यावा.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या विषयाबाबत काय करायचे?
मा.अविनाश बागवे–हे रद्द केले पाहिजे आणि त्यांनी नवीन डॉकेट ठेवावे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हे पुन्हा पुढच्या आठवड्यात ठेवावे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–रेट कमी करून विषयपत्र ठेवावे.
**निर्णय**–सदर विषयाबाबत प्रशासनाने फेरविषयपत्र सादर करावे.
विषय क्र.२०५४/ठराव क्र.२०५४
उपनगरसचिव–या विषयाला मा.सभासदाची उपसूचना आहे की, मा.मुख्यसभा ठ.क्र.१४९, दि.४/१०/१९८३ नुसार मा.महा.आयुक्त यांनी दि.१५ जानेवारी २०१६ अगर तत्पूर्वी सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक, क अंदाजपत्रक, स्थायी समितीपुढे सादर करावे.
मा.सौ.मुक्ता टिळक–ही उपसूचना कोणाची आहे?
उपनगरसचिव–माझ्याकडे या विषयाला मा.सौ.वस्ते आणि मा.कर्णेगुरुजी यांची उपसूचना आली आहे.
मा.अविनाश बागवे–हे शक्य आहे का?
मा.राजेंद्र जगताप, अति.महा.आयुक्त (इ)–आम्ही याबाबत मा.पक्षनेते मध्ये चर्चा करू.
मा.सौ.मुक्ता टिळक–पक्षनेते सभेचा संबंध काय आहे? हा विषय इथे आला आहे.
मा.अविनाश बागवे–याबाबत सभागृहनेत्यांनी सूचना करावी.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी, आयुक्त साहेबांना..
मा.सौ.मुक्ता टिळक–मा.सभागृहनेते त्याबद्दल बोलू नका.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ठीक आहे.
मा.अविनाश बागवे–हे पॉसिबल आहे का?
मा.अनिल राणे–मा.आयुक्त साहेब आपले बजेट तयार झाले नाही का?
मा.महा.आयुक्त–ते २५ तारखेपर्यंत तयार होईल.
मा.अनिल राणे–साहेब, तुम्ही १६ तारखेला जात असल्याने हे बजेट दि.१५ तारखेला सादर करण्यास हरकत नव्हती. आपल्याला अगोदरची तारीख घेता आली असती.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, मा.आयुक्त साहेबांच्या दौऱ्याबाबत आम्हाला कोणताही आक्षेप नाही. तो दौरा १६ तारखेला आखलेला आहे आमचे असे म्हणणे होते की, आपण हे अंदाजपत्रक मा.मुख्यसभेच्या ठरावाप्रमाणे दि.१५ जानेवारी किंवा तत्पूर्वी सादर करावे आणि यामध्ये मा.मुख्यमंत्री महोदयाच्या दौऱ्याचा संदर्भ देऊ न हा विषय का आणला जात आहे? मा.आयुक्त साहेबांना, मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यामध्ये जायचे आहे परंतु बजेट आणि दौरा हे मुद्दे कुठेही क्रॉस होत नाही.
मा.महा.आयुक्त–मा.अध्यक्षा, महोदया, आपण यावर्षी बजेटच्या फॉरमॅट मध्येही बदल करीत आहोत. ते बजेट सादर करताना लक्षात येईल. त्यामुळे काही कारणे आहेत आणि त्यामुळे वेळ लागत आहे. ८ ते १० दिवसांचा वेळ लागणार आहे. खरे पाहता हा वेळ लागायला नको होता परंतु वेळ लागत आहे कारण आपण यामध्ये बदल करीत आहोत. त्यामुळे २५ तारखेपर्यंत वेळ मिळावा, अशी अपेक्षा आहे.
मा.अध्यक्षा–सर, आपण हे कारण बदला आणि यामध्ये हे कारण आहे असे सांगा.
मा.महा.आयुक्त–हे सुध्दा कारण आहे.
मा.अध्यक्षा–दौऱ्याचे कारण सांगत आहात आणि मुळामध्ये ठराव असा आहे.
मा.महा.आयुक्त–बजेट तयार करण्याबरोबरच आपल्या २४ बाय ७ या योजनेमध्ये काही निर्णय घेणे अपेक्षित होते त्यामध्ये काही बदल होते त्याबद्दल चर्चा चालू होती आणि त्यामध्ये थोडासा वेळ लागला आणि बजेटच्या फॉरमॅट मध्ये सुध्दा बदल आहे आणि त्याबरोबरच हा दौरा आला आहे, अशी तीन कारणे होती आणि यामध्ये दुर्देवाने १० दिवस जास्त लागतील. मला सभागृहाला विनंती करायची आहे की, ते १० दिवस मिळावेत.जेणेकरून आपल्याला बजेट योग्य पध्दतीने सादर करता येईल.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–२४ बाय ७ चा विषय मा.स्थायी समिती आणि मुख्यसभेमध्ये यापूर्वीच तुम्हाला मान्य करून दिला आहे. हे बजेट मध्ये करण्यासाठी आता काहीही अडथळा नव्हता. यामुळे असे होणार आहे की, तुम्ही बजेट जेवढ्या उशीरा सादर कराल, तेवढा आम्हाला चर्चेला कमी वेळ मिळणार आहे आणि त्यामुळे आहे तसेच पुढे पाठवावे, अशा प्रकारचा चुकीचा निर्णय घेणे भाग पडणार आहे.
मा.महा.आयुक्त–त्या योजनेची बजेटमध्ये अंमलबजावणी होणार आहे. अंदाजपत्रक महासभेत मांडण्यासाठी १ फेब्रुवारी पर्यंतची मुदत आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षांनी हे बजेट मुख्यसभेत मांडण्यासाठी दि.२८ फेब्रुवारीपर्यंतच मुदत आहे.
मा.महा.आयुक्त–मागील वेळेस २८ फेब्रुवारी रोजी सादर करण्यात आले होते.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–होय, मी अध्यक्ष असताना दि.२८ फेब्रुवारी रोजी अंदाजपत्रक मुख्यसभेत मांडले होते.
मा.महा.आयुक्त–त्या ठरावामध्ये अंदाजपत्रक स्थायी समितीला मांडण्याची तारीख दि.१ फेब्रुवारी अशी आहे.
मा.अविनाश बागवे–यामध्ये सगळयांचा गोंधळ दोन गोष्टीमुळे होत आहे की, एकतर चर्चेला वेळ कमी मिळणार आणि जितके उशीरा करणार तितके इंम्पिलेमेंट उशीराने होणार.

मा.महा.आयुक्त–इंम्पीलिमेंट दि.१ एप्रिल पासूनच होते.

मा.अविनाश बागवे–यामध्ये एक उपाय होऊ शकतो. आपण आज यामध्ये कितीही काही केले तरी, ही उपसूचना मान्य केली तरी आज १३ तारीख आहे आणि तुम्ही २ दिवसांच्या आत ते सादर करू शकत नाही. आमची अशी विनंती आहे की, या बेसवर तुम्ही बजेट सादर केल्यानंतर आम्ही स यादीत बदल करू तो भाग वेगळा आहे परंतु जे नागरीकांच्या सहभागाचे बजेट असेल किंवा क्षेत्रिय कार्यालयाचे बजेट असेल किंवा तुम्ही जे बजेट केले असेल. शक्यतो मा.आयुक्त साहेबांनी तयार केलेल्या बजेटमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत नाहीत आणि या बेसवर की, तुम्ही मार्च मध्येच ईस्टीमेंट तयार करणार आणि याबाबतच्या जाहिराती एप्रिल मध्येच द्याव्या लागणार आहेत. परंतु कागदोपत्री तयार माहे मार्च मध्येच तयार करू ह्या बेसवर तुम्ही करा म्हणजे त्यामध्ये १० ते १५ दिवस मिळतील.

मा.महा.आयुक्त–एप्रिल मध्येच जाहिरात काढणार आहोत आणि एक उदाहरण देतो की, ज्या झाडणकामाच्या जाहिराती असतील त्या माझे बजेट सादर झाल्याबरोबरच काढणार आहे. कारण त्या रक्कमेमध्ये सुधारणा झाल्या आहेत.

मा.अविनाश बागवे–सगळयांच्या मनामध्ये तीच शंका आहे. अंदाजपत्रकाची अंमलबजावणी लवकर झाली तरी कामे सुरळीत होतील.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यामुळे आम्हाला खातेनिहाय चर्चेला वेळच मिळणार नाही.

मा.महा.आयुक्त–यामध्ये मा.स्थायी समितीला १ फेब्रुवारीची मुदत आहे आणि मागील वर्षी दि.२८ फेब्रुवारी रोजी अंदाजपत्रक सादर झाले होते.

मा.अध्यक्षा–अंदाजपत्रक मान्य करण्याची तारीख किती आहे?

मा.महा.आयुक्त–मान्यतेची तारीखच नाही.

मा.अध्यक्षा–मागील वर्षात मा.कर्णे गुरूजींनी मांडलेले अंदाजपत्रक कोणत्या तारखेस मान्य झाले?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते मार्च महिन्यात मान्य झाले होते ते एक महिना उशीरा झाले होते परंतु ते दि.२८ फेब्रुवारी रोजी मा.मुख्यसभेकडे मांडले होते.

मा.महा.आयुक्त–आता दि.२५ जानेवारी पासून दि.२८ फेब्रुवारी पर्यंत वेळ आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–म्हणजेच चर्चा करायला वेळ कमी पडणार नाही.

मा.महा.आयुक्त–आपण आज जरी माहिती काढली तर कुठल्याही महापालिकेचे बजेट ३० जानेवारी पर्यंत सादर होत नाही आणि काही महापालिकांमध्ये तर त्यांचे बजेट जून मध्ये होते.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते निवडणूकीच्या काळापुरते होते.

मा.महा.आयुक्त–मी नागपूर मध्ये असताना तेथे असे केले होते की, ते असा ठराव करतात की..

मा.सौ.मुक्ता टिळक–प्रशासकीय मुदतवाढ.

मा.अविनाश बागवे–सर,महाराष्ट्रात सगळीकडे पुण्याचीच पध्दत फालो केली जाते.

मा.महा.आयुक्त–यामध्ये वेळ लागत आहे.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–माहे फेब्रुवारी मध्ये सादर होते परंतु मार्च मध्ये मान्य होते.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामध्ये तुम्ही बजेटचा ट्रेंन्ड बदलत आहात, असे सांगितले आहे आणि आता सर्व प्रभाग समित्यांनी आपला ट्रेन्ड नाकारलेला आहे.

मा.अनिल राणे–तुम्ही प्रभाग समित्यामध्ये वाईज म्हणून जो इंडेक्स तयार केला आहे आम्हाला त्याची काहीच कल्पना नाही. आपण यासाठी कोणाची परवानगी घेतली? हे आपण ठरविले आहे का? भांडवली कामाचे बजेट प्रशासनच ठरविते आणि त्याची जवळपास १०० टक्के अंमलबजावणी होते आणि मग प्रशासन ठरविते तिथेच तुम्ही वाईज इंडेक्स केला आहे.

मा.महा.आयुक्त–वाईज ही कोणतीही संस्था नाही. वाईज हे इंडेक्सचे नाव आहे. आपण नगर अभियंत्यांची मदत घेऊन ते तयार केले आहे. तो डेफिशिएट इंडेक्स आहे. बेसीकली कुठल्या भागामध्ये किती विकास झाला आहे? त्याचा इंडेक्स तयार करून ज्या भागामध्ये आतापर्यंत कमी विकास झाला आहे त्या भागामध्ये जास्त पैसे मिळावेत यासाठी आपण तो इंडेक्स तयार केला आहे आणि त्यामागे तो हेतू आहे.

मा.अविनाश बागवे–तुमचा जो मोटीव्ह आहे तो चांगला आहे त्याबद्दल काही शंका नाही. परंतु त्यांची अंमलबजावणी चुकीच्या पध्दतीने झाली आहे. आता इतर सभासद सांगू शकणार नाही परंतु भवानी पेठेच्या बाबतीत मी सांगतो की, कदाचित काहीतरी काम असेल परंतु दुर्देवाने त्या बैठकीला मा.गरड साहेब उपस्थित नव्हते.

मा.गरड,उप आयुक्त(परिमंडळ क्र.३)–एकाच वेळेस चारही बैठका होत्या मी टिळक रोड आणि सहकारनगर मध्ये सुध्दा उपस्थित होतो.

मा.महा.आयुक्त–परंतु मी सगळ्या झोनल कमिशनर्संना आदेश दिले होते की, तुम्ही सगळ्या प्रभाग समित्या अटेंड कराव्यात.

मा.गरड,उप आयुक्त(परिमंडळ क्र.३)– साहेब, मी दोन प्रभाग समित्यांना उपस्थित होतो.

मा.अध्यक्षा–ते एकाच वेळेस चारही ठिकाणी कसे हजर राहू शकतील.

मा.महा.आयुक्त–ते दोन दिवसांचे करायला पाहिजे होते.

मा.अध्यक्षा–तुम्ही सगळीकडे एकच वेळ दिली होती.

मा.अनिल राणे–तुम्ही सर्व क्षेत्रिय कार्यालयांना ३.३० ची वेळ दिली होती. तुम्ही आदल्या दिवशी परिपत्रक दिले आणि लगेच दुसऱ्या दिवशी बैठक घेतली.

मा.अध्यक्षा–एकच झोनल ऑफिसर, एकाच दिवशी सगळ्या प्रभाग समित्यांना कसे जाऊ शकतील?

मा.अनिल राणे–तुम्ही आणि सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी मिळून वेळ ठरविली होती का?

मा.महा.आयुक्त–आपण जेव्हा एखादे काम करण्यासाठी बसतो त्यानंतर त्याची चर्चा करतो परंतु त्याची अंमलबजावणी व्यवस्थित होत नसल्याने हे सगळे प्रकार होत आहेत. सर्व उप आयुक्तांना स्पष्ट आदेश दिले होते की, मिटींग्ज आयोजित करून या सर्व गोष्टी स्पष्ट कराव्यात आणि त्यांनी हे केले नाही तर या गोष्टी होणारच आहे. हे सरळच आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–त्यासाठी आम्ही कसबा विश्रामबागवाडा क्षे.कार्या.चे सगळे नगरसेवक सकाळी ११.०० वा.तिथे उपस्थित होतो आणि क्षेत्रिय अधिकाऱ्यांना यातील फारसे काही माहिती नव्हते आणि मा.क्षेत्रिय आयुक्त उपस्थित नव्हते त्यामुळे आम्हाला ती सभा तहकूब करावी लागली.

मा.अविनाश बागवे–आमच्या क्षेत्रिय कार्यालयाकडे, मा.क्षेत्रिय अधिकारी त्यांच्या घरातील लग्नकार्यामुळे रजेवर होते आणि आमच्या अे.ई.नी असे सांगितले की, मला यातील काहीच माहिती नाही. इतर क्षेत्रिय कार्यालयांमध्ये क्षेत्रिय अधिकारी तरी उपस्थित असतील आणि म्हणून मी हे सांगितले आहे.

मा.गरड,उप आयुक्त(परिमंडळ क्र.३)–मी सकाळी ११.०० वा.फोन केला होता आणि त्यावेळी मा.सभासद आले नाहीत असे सांगितले होते आणि मग मी सहकारनगरला गेलो आणि नंतर टिळक रोड क्षे.कार्यालयाकडे गेलो होतो.

मा.अविनाश बागवे–आम्ही वेळेत आलो नाही म्हणून उपायुक्त तिकडे गेले. यावर जी चर्चा झाली त्यातील तांत्रिक मुद्दा सांगतो की, मा.सौ.व्यवहारे, प्र.क्र.६५, प्र.क्र.४७–मा.सुधीर जानजोत आणि यांनी जे इंडेक्स सेशन घेतले होते त्यानुसार त्यांनी आम्हाला असे सांगितले की, यासाठी जो डाटा घेतला आहे तो डाटाच चुकीचा आहे. तिथे जर दोन कॉलनीज असतील तर त्यामध्ये ३ कॉलनीजचा उल्लेख आहे. रस्ते वेगळे घेतले आहेत आणि स्लम मधील शौचालये आणि केअर टेकर यांची आकडेवारी चुकीची आहे आणि म्हणून तो इंडेक्स चुकला आहे असे आमच्या सगळयांचे म्हणणे आहे. सर, आपण हे जर एक महिन्यापूर्वी सांगितले असते तर खूप चांगल्या पध्दतीत आणि सगळयाच्या सहकार्याने हे झाले असते. ती अर्धवट चर्चा झाल्यामुळे किंवा तुम्ही खालील स्तरावर जे सांगितले ते क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर किंवा जे.ई.च्या स्तरावर व्यवस्थित पोहचले नाही. त्यावेळी स्लम विभागाचे, पथ विभागाचे जे अधिकारी आणि त्यांच्याकडून जे रस्ते घेतले आहेत किंवा जो डाटा घेतला आहे. त्यांनी माझ्या प्रभागातील एकच रस्ता घेतला होता आणि ज्याच्या दोन्ही बाजूंना फूटपाथ उपलब्ध आहेत. या रस्त्याचे नाव विचारले असता त्यांना या रस्त्याचे नाव सांगता आले नाही आणि त्यांनी बाकीचे रस्त्यांची पाहणी न करता ही अशी माहिती दिल्याचे सांगितले. अशी चुकीची माहिती दिल्यामुळे ते चुकीचे होत आहे.

मा.अनिल राणे–आमच्या वॉर्ड ऑफिसला ते सुध्दा कळाले नाही.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.आयुक्त साहेब, आपण वेगळया ट्रेंडने करणार आहात म्हणून सुचवितो की, रस्त्यांच्या खाली ज्या ज्या लाईन्स असतील किंवा इतर कुठल्याही केबल्स असतील, याचे कुठेही मॅपिंग नाही. आता आमची अशी विनंती आहे की, या बजेटमध्ये ते व्यवस्थित लोकेट करून त्याला पुरेसे बजेट द्या मॅपिंग करा. नाहीतर कोणत्या रस्त्यांच्या जमीनीखाली काय आहे? याची माहिती राहणार नाही आणि दर ३ वर्षांनी अधिकाऱ्यांच्या बदल्या होतात आणि कर्मचारी असे सांगतात की मी नवीन आलो आहे मला काही माहिती नाही.

मा.महा.आयुक्त–हे काम चालू आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये जे जे.ई.संबंधीत आहेत त्यांनी लक्ष घातले पाहिजे. जे.ई.ना काही माहिती नाही, अशी परिस्थिती आहे. बजेट मध्ये काम दिसले की, ते ईस्टीमेंट करायला सुरूवात करतात परंतु हे मॅपिंग पाहणे त्यांचे काम आहे. तुम्ही जरी करून दिले तरी सुध्दा हे पाहण्याचे काम जे.ई.चेच आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामध्ये मा.महा.आयुक्त साहेब, अंदाजपत्रक सादर करणार असल्याचे तारीख, मा.स्थायी समितीने अंतिम निर्णय घेण्याची तारीख आणि मा.मुख्यसभेने अंदाजपत्रक मान्य करण्याची अंतिम तारीख या बाबी फायनल केल्या पाहिजेत.

मा.अनिल राणे–आम्हाला अभ्यास करायला वेळ लागणार आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–मग हे मान्य आहे का?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आम्ही उपसूचना मागे घेतो आणि विषयपत्र मान्य करावे.

मा.अध्यक्षा–अंदाजपत्रकाच्या सर्व तारखा मिनिटसवर घ्याव्यात.

मा.उपनगरसचिव–अंदाजपत्रकाबाबतच्या तारखा वाचून दाखवितो. अंदाजपत्रक सादर करण्याची तारीख दि.२५ जानेवारी, त्यानंतर मा.स्थायी समितीने अंतिम निर्णय घेण्याची तारीख दि.११ फेब्रुवारी किंवा तत्पूर्वी आणि मा.स्थायी समितीने मान्य केलेले अंदाजपत्रक मा.सभासद यांना देण्यासाठी तारीख, यामध्ये साधारणत: १० दिवसांचा कालावधी ठेवावा लागेल. ती तारीख २२ फेब्रुवारी, अगर तत्पूर्वी अशी आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ठीक आहे. हा विषय मान्य करून पुढील विषय घ्यावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.२०५५/ठराव क्र.२०५५

उपनगरसचिव–हा आस्थापनेचा विषय आहे.

मा.अध्यक्षा–मा.सभासदानी मा.महा.आयुक्त साहेबांना जपान टूर्ससाठी परवानगी दिली आहे परंतु आपण दरवेळेस जाता आणि रिकाम्या हाताने परत येता.

मा.महा.आयुक्त–आपल्याला एक चांगली बातमी द्यायची आहे. आपण आतापर्यंत ऐकत होतो की, जायकाचा प्रोजेक्ट मंजूर झाला आहे परंतु आज सकाळी ११.०० जायका आणि भारत सरकार यांच्यामध्ये लोन ॲग्रीमेंट साईन झाले. हे लोन ॲग्रीमेंट दोन महिन्यांपासून काही ना काही कारणास्तव पेन्डींग होते ते आज फायनल झाले आहे. यामुळे आपला तो प्रोजेक्ट मार्गी लागेल.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय पुढे का घेत आहात?
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा धोरणात्मक निर्णय आहे याबाबत पुढील सभेत निर्णय करू.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ठीक आहे.
**निर्णय**–सदर विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
उपनगरसचिव–तहकूब परिपत्रावरील दाखलचे विषय सुरू करीत आहोत.
विषय क्र.२०५६/ठराव क्र.२०५६
उपनगरसचिव–हा फेरविचाराचा प्रस्ताव आहे. आपण हा मूळ विषय अभिप्रायसाठी पाठविला होता आणि त्याचा फेरविचार त्यांनी दिला आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय कोणाचा आहे?
उपनगरसचिव–मा.विष्णू हरीहर यांचा विषय आहे.
मा.श्रीकांत जगताप–तो मान्य करावा म्हणून अभिप्राय आला आहे का?
उपनगरसचिव–होय.
मा.अध्यक्षा–मूळ प्रस्ताव मान्य करावा.
**निर्णय**–सदर विषयाबाबत सर्वानुमते, मूळ प्रस्ताव मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०५७/ठराव क्र.२०५७
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
मा.उपनगरसचिव–मूळ प्रस्ताव मान्य.
मा.अध्यक्षा–मूळ प्रस्ताव मान्य करावा.
**निर्णय**–सदर विषयाबाबत सर्वानुमते, मूळ प्रस्ताव मान्य करण्यात आला.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–विषय क्र.२०५६, २०५७ याचे मूळ विषय वाचून दाखवावेत.
उपनगरसचिव–यांनी वरील दोन्ही विषय वाचून दाखविले.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–मान्य आहेत.
विषय क्र.२०५८/ठराव क्र.२०५८
मा.शंकर केमसे, सभागृहनेते– हा विषय मान्य करावा.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०५९/ठराव क्र.२०५९
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–मा.मुख्यसभा मान्यता देईल या भरवश्यावर कार्यवाही करावी, अशी टीप टाकावी.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०६०/ठराव क्र.२०६०
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.२०६१/ठराव क्र.२०६१
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
मा.अध्यक्षा–मा.आयुक्त साहेब, आपण हे वर्गीकरण उपलब्ध करून देत आहात परंतु हे एक अपत्यांवर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केलेल्या मनपा सेवकांना दोन जादा वेतनवाढ देणे या तरतूदीमधून देत आहात.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–याबाबत खात्याने माहिती द्यावी. मागील वेळेस सुध्दा हा विषय मा.मुख्यसभेमध्ये मान्य करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता परंतु शासनाने यावर उत्तर पाठविले नाही.
मा.मंगेश जोशी,उपायुक्त(सामान्य प्रशासन)–उत्तर आले आणि आपण त्यांना रिमायंडर पाठविले आहे. ही जी तरतूद आहे ती खर्ची पडणार नाही त्यामुळे हे वर्गीकरण दिले आहे.
मा.अध्यक्षा–प्रशासनाच्या माध्यमातून अशा अधिकारी /कर्मचाऱ्यांना यानिमित्ताने दोन वेतनवाढी देणे ही एक चांगली बाब आहे. ही एक शाबासकी आणि प्रोत्साहनपर आहे. या संदर्भात शासनाकडे पत्रव्यवहार करून त्यांचा अभिप्राय ताबडतोब मागवून घ्यावा. आपण एकीकडे तरतूद करीत आहोत आणि दुसरीकडे वर्गीकरण करीत आहोत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मागील वर्षी मी आणि डॉ.धेंडे यांनी हा विषय दिला होता आणि हा विषय मुख्यसभेच्या मान्यतेनंतर शासनाकडे पाठविला होता. त्यांच्याकडे यावर चर्चा होऊन सुध्दा निर्णय झाला नाही त्यामुळे हा विषय पेन्डींग आहे.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–हा हेड बदलावा.
मा.राजेंद्र शिळीमकर–ज्यांना एक अपत्य आहे त्यांच्यासाठी आपण असा विषय आणतो परंतु ज्यांना अपत्यंच नाही त्यांना आपण काय देणार आहोत. त्यांना याच्यांपेक्षा जास्त काहीतरी दिले पाहिजे. या विषयाबद्दल माहिती द्यावी.
मा.जोशी,उपायुक्त(सामान्य प्रशासन)–जे अधिकारी कर्मचारी एका अपत्यावर कुटूंबनियोजनाची शस्त्रक्रिया करवून घेतात त्यांना आपण पूर्वी अनुदान दिले होते. शासनाचे एक गॅझेट पाहून ही योजना चालू केली होती परंतु शासनाकडेच याची अंमलबजावणी झाली नव्हती त्यामुळे आपण ती योजना थांबविली होती. ती योजना चालू करण्यासाठी आपण आता जी.बी.चा ठराव दिला आहे आणि ते शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविले आहे. अंतिम मान्यता झाल्यानंतर ते संबंधीत सेवकांना दिले जाईल.
मा.राजेंद्र शिळीमकर–या ज्या योजना आहेत ते शासन करेल, आपण ह्या योजना का करीत आहोत? काही काही लोकांनी विवाह केला नाही, मग त्यांना सुध्दा एक योजना लागू करा.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय चांगला आहे परंतु अंमलबजावणी होऊ शकत नाही म्हंटल्यावर वर्गीकरण करण्याशिवाय पर्याय नाही.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०६२/ठराव क्र.२०६२
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य आहे परंतु या विषयाची अंमलबजावणी करणार आहे का? याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी. या मध्ये काही अधिकाऱ्यांनी अडचणी सांगितल्या आहे. लोखंडी बाके बसविणे या कामाची अंमलबजावणी का झाली नाही? याबाबत माहिती द्यावी.
मा.गरड,उप आयुक्त(परिमंडळ क्र.३)–जागेवर निकड बघून ड्रेनेज लाईन टाकणे या कामाची अंमलबजावणी केली जाईल.
मा.अनिल राणे–यामध्ये हेडवर लोखंडी बाके बसविणे अशी तरतूद होती ते का काम झाले नाही?
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–त्यांना लोखंडी बाके नको असतील.
मा.अध्यक्षा–वस्तुस्थिती तशी नाही. प्रभाग समिती स्तरावर अजून सुध्दा मा.महा.आयुक्त साहेबांच्या आदेशाचे पालन चालू आहे आणि म्हणून ते काम होऊ शकत नाही आणि आता त्याचे वर्गीकरण होत आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–सर्व सभासदानी माहिती समजून घ्यावी की, मा.आयुक्त साहेबांचे परिपत्रक गेल्यानंतर, त्या तारखेपूर्वी ज्यांनी अंमलबजावणी केली त्यांचे मान्य केले आणि त्यानंतर आता ज्यांचे टेंडर झालेले नव्हते त्यांचे ती कामे तशीच राहिली आहेत. याबाबत माहिती द्यावी.
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्याची पाहणी करून ते काम करता येईल.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०६३/ठराव क्र.२०६३
मा.गरड,उपायुक्त(परिमंडळ क्र.३)– मा.अध्यक्षा,या विषया मध्ये स यादीचा उल्लेख नाही.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते वगळून करावे.
उपनगरसचिव–क बजेटचे वर्गीकरण करता येत नाही.
मा.अध्यक्षा–अनु.क्र.२ चे काम, र.रू.२० लाख वगळून हा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते, अनुक्रमांक २ वगळून मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०६४/ठराव क्र.२०६४
मा.बापूराव कर्णे गुरूजी– हा विषय मान्य करावा.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०६५/ठराव क्र.२०६५
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०६६/ठराव क्र.२०६६
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०६७/ठराव क्र.२०६७
मा.अध्यक्षा–हा विषय एक आठवडा पुढे घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.२०६८/ठराव क्र.२०६८
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०६९/ठराव क्र.२०६९
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.२०७०/ठराव क्र.२०७०
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०७१/ठराव क्र.२०७१
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०७२/ठराव क्र.२०७२
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०७३/ठराव क्र.२०७३
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०७४/ठराव क्र.२०७४
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०७५/ठराव क्र.२०७५
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०७६/ठराव क्र.२०७६
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.२०७७/ठराव क्र.२०७७
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.आयुक्त साहेब, आजच्या वर्तमानपत्रात आपल्या विधी खात्याबाबत स्टेटमेंट आले आहे त्याबाबत सदरची केस काय आहे? याबाबतची माहिती द्यावी.

मा.अध्यक्षा–एवढी नोटीस काढून, वृत्तपत्रात बातमी येण्यापर्यंत त्या संदर्भात काय झाले? त्या केसबाबत मा.सभासदाना माहिती द्यावी.

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–मा.अध्यक्षा, त्यामध्ये वृक्षतोडीच्या खटल्याची केस आहे. ती खालच्या कोर्टामध्ये आहे. ती केस चालू असताना केस विड्रॉल करण्याबाबतचा अर्ज दाखल करण्यात आला होता. तशा सूचना केल्या गेल्या होत्या. त्या अर्जाच्या अनुषंगाने ती तक्रार आली होती. फियार्दीच्याच वतीने तो अर्ज दाखल केला गेला आणि तशा सूचना वकीलांना केल्या होत्या.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–सदर केसचा निकाल मनपाच्या विरोधात गेला की, मनपाच्या बाजूने लागला?

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–तो निकाल मनपाच्या बाजूनेच लागला होता. त्यामध्ये त्यांना शिक्षा झाली.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–कोणाला शिक्षा झाली?

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–आरोपींना वृक्ष तोडीबद्दल दंड झाला आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यामध्ये महानगरपालिकेचे नेमके काय नुकसान झाले?

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–नुकसान झाले नाही आरोपींना शिक्षा झाली होती आणि यामध्ये केस काढून घेण्यासाठी कोर्टामध्ये अर्ज दाखल केला गेला होता. त्यामध्ये साक्षीदारांना कोर्टामध्ये हजर करण्यात आले नव्हते, अशी तक्रारदाराची तक्रार होती.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपल्या बाजूने निकाल लागला त्यामुळे मनपाचे नुकसान झाले आहे का?

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–नाही, खटल्यामध्ये सर्वांना शासन झाले आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामुळे आपण मा.आयुक्त साहेबांकडे, एखाद्या अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याची परवानगी आपण मागितली आहे का?

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–लोकशाही दिनामध्ये त्याच्या साक्षीदारांने तक्रार केली होती. ते स्वत: या केस मध्ये साक्षीदार होते. या केस मध्ये खटला विड्रॉल करण्याबाबत अर्ज दाखल केला होता.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–खटला विड्रॉल करण्यासाठी कोणी अर्ज केला होता?

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–गार्डन खात्याकडील फियार्दी श्री.भिसे यांनी तो अर्ज दाखल केला होता.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपल्या खात्याने?

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–नाही, गार्डन खात्यामार्फत विधी खात्याकडे आला होता आणि विधी खात्याकडून त्या वकीलांकडे..

मा.बापूराव कर्णे गुरूजी–संबंधीत अधिकाऱ्याने सेटलमेंट करायला पाहिजे होती का? नेमके म्हणणे काय आहे? जर मनपाच्या बाजूने निकाल लागलेला आहे. मनपाचे काहीही नुकसान झालेले नाही. मग त्या अधिकाऱ्याने त्या सेटलमेंट मध्ये सहभागी होऊन हे क्लेअर करून, निकाल मनपाच्या विरोधात गेला तरी चालेल, अशी आपली भूमिका आहे का?
मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–नाही, केवळ त्या तक्रारदारामुळे ती केस विड्रॉल करता आली नाही अन्यथा ती विड्रॉल झाली असती, असे तक्रारदाराचे म्हणणे आहे.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–उद्यान विभागाकडून माहिती घ्यावी.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–तात्पर्य काय आहे की, आज वर्तमानपत्रात अशी बातमी आली की, संबंधीत अधिकाऱ्यावर खटला भरण्याची परवानगी देण्याबाबत शो–कॉज नोटीस मिळाली.
मा.अध्यक्षा–आम्हालाही हे असे कळाले आहे.
मा.अविनाश बागवे–खात्याकडून खुलासा मागविला आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–माझी आपल्याला विनंती आहे की, महानगरपालिकेचे केसेस सक्सेसफुली चालवायच्या असतील तर तुमच्यातील मतभेद पहिल्यांदा मिटवावेत.
मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–मतभेद नाहीत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मतभेदच आहेत.
मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–ही अगोदरची केस आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मी तुम्हाला अनेक केसेस मध्ये मतभेद दाखवितो. तुम्ही सस्पेंड होतात त्यावेळेस सुध्दा तुमच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांचेच सुध्दा हेच चालू होते. त्यावेळी चव्हाण हे अधिकारी होते.
मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–मा.अध्यक्षा महोदया, उद्यानचे अधीक्षक याबद्दल खुलासा करू शकतील.
मा.अनिल राणे–त्यावेळी घोरपडे साहेब उद्यान अधीक्षक नव्हते.
मा.अध्यक्षा–सर, याबाबतची सर्व पाहणी करण्याच्या आधी नोटीस देणे उचित नाही आणि वर्तमानपत्रात बातमी आल्यानंतर अधिकाऱ्यांची बदनामी होत नाही का? त्या महिला अधिकारी आहेत. त्यांना सहकार्य करायचे सोडून हे काय चालू आहे?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–अशा प्रकारचे मतभेद चव्हाट्यावर येऊ नयेत.
मा.राहूल तुपेरे–अधिकाऱ्यांचे काय चुकले? ते तरी कळू द्या.
मा.अध्यक्षा–आता चव्हाट्यावर आले आहे आणि आपण यामध्ये शो–कॉज नोटीस देताना आपण सगळी पाहणी का केली नाही? पाहणी न करता तुम्ही हे असे कसे काय डिक्लेअर करू शकता? अशा प्रकारांमुळे आपणच आपली बदनामी करायची का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–दुसरा मुद्दा असा आहे की, पुणे दर्शनच्या बसेस आगाखान पॅलेसजवळ येतात. परंतु तेथील बी.आर.टी.मुळे तेथील ओपनिंग बंद केले आहे आणि यामुळे पुणे दर्शनच्या बसेसला आगाखान पॅलेसच्या प्रिमायसेस मध्ये जात नाही. तसेच बाहेरून आलेल्या बसेस सुध्दा आत जात नाही. सगळया बसेस बाहेर रोडवर उभ्या राहतात. यावर उपाययोजना झाली पाहिजे त्या बसेस आगाखान पॅलेसच्या प्रिमायसेस मध्ये गेल्या पाहिजेत. तेथे बस वळण्यासाठी जागा नाही. मी तेथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून आलो आहे. याबाबत आम्हाला पुढील आठवड्यात निर्णय पाहिजे. त्या रस्त्यावर वळण्यासाठी दीड कि.मी.पुढे जागा केली आहे आणि तिथून परत आल्यानंतर सुध्दा तेथे बसचा टर्न बसत नाही. मा.बोनाला साहेब, मी सांगतो ती वस्तुस्थिती खरी आहे की नाही? मग यामधून मार्ग काढावा.
मा.बोनाला, (वाहतूक)– मी पी.एम.पी.एम.एल.चा रूट प्लॅन पाहून त्यामध्ये काही बदल करून, त्या बसेस रस्त्यावर उभ्या राहणार नाहीत, याबद्दल उपाययोजना करू.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यासाठी दुसरे मोठे ओपनिंग द्यावे लागेल. आतमध्ये गाड्या पार्किंग होतील, असे नियोजन करा.
विषय क्र.२०७८/ठराव क्र.२०७८
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
उपनगरसचिव–मा.अध्यक्षा, आज मान्य झालेले सगळे मुख्य सभेकडे जाणारे विषय वन–के खाली दाखल करून घेतो.
मा.अविनाश बागवे–होय, वन–के खाली दाखल करून घ्यावेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आजचे वर्गीकरणाचे विषय, मा.मुख्यसभा मान्यता देईल, या भरवश्यावर, अशी एक टीप टाकावी. कारण आता खूप कमी वेळ राहिला आहे.

अशा पध्दतीने सभा समाप्त झाल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

**उपनगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**